ePaper

## पंतप्रधान मोदींनी 11 वाजता बोलावली सुरक्षा समितीची बैठक

## पाकिस्ताच्या हद्दीत घुसून एअर स्ट्राईक



| वर्ष - 8 | अंक - 275 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | बुधवार, दि. 7 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



## मिनी विधानसभेच्या चार महिन्यात निवडणुका घेण्याचे आदेश !

# उद्धव ठाकरे, शरद पवार गट, मनसेच्या अस्तित्वाची लढाई!

## ‘महायुती’ मध्ये बऱ्यापैकी आलबेल : ‘महाआघाडी’त लाथाळ्या सुरू...

| नवी दिल्ली / मुंबई | प्रतिनिधी | महाईन्यूज

**‘मिनी विधानसभे’ ची लढत समजल्या जाणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आगामी चार महिन्यात घ्या, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यामुळे सर्वच राजकीय पक्षांचे डोळे खाडकन् उघडले आहेत. सर्वांना पाच वर्षांनंतर ताकद दाखवण्याची संधी मिळणार आहे.**



### शिंदे, अजितदादांचे टेन्शन गेले..

एकीकडे, ‘महायुती’ च्या तीन पक्षांमध्ये म्हणजे भाजपा, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गट यांच्यामध्ये बऱ्यापैकी सबुरीचे वातावरण आहे. निवडणूक एकत्रच लढू, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केल्यामुळे अन्य दोन पक्षांचे टेन्शन गेले आहे. याउलट, उद्धव ठाकरे यांचा गट आणि शरद पवार यांचा गट हे मात्र तणावाखाली आले असून त्यांच्या अस्तित्वाची लढाई सुरू झाली आहे. त्यांच्या आघाडीत असलेला मुख्य पक्ष म्हणजे काँग्रेसचा आघाडीबाबतचा निर्णय झालेला नाही.


### मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक महत्त्वाचे..

सर्व राजकीय पक्षांच्या दृष्टीने मुंबई महानगरपालिका ही निवडणूक अतिशय महत्त्वाची आहे. जो मुंबईवर राज्य करतो, तो महाराष्ट्रावरही करतो अशी एक भावना आहे. त्या पाठोपाठ पुणे, ठाणे, नाशिक, नागपूर, संभाजीनगर या महानगरपालिका निवडणुकांकडेही सर्वांचे लक्ष असेल. देशातील अन्य अनेक राज्यांपेक्षा मुंबई महानगरपालिकेचा अर्थसंकल्प बराच मोठा असतो, त्यामुळे एक प्रतिष्ठेची लढाई म्हणून या निवडणुकीकडे पाहिले जात आहे.

### फासे कसे पडणार, हे महत्त्वाचे !

मुंबई महानगरपालिकेची निवडणूक डोळ्यासमोर ठेवून अनेक राजकीय पक्ष आपले फासे टाकत आहेत. त्यामध्ये राज ठाकरे यांचा महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा पक्ष आपल्याबरोबर यावा, म्हणून शिवसेना शिंदे गट, भारतीय जनता पार्टी एवढेच काय उद्धव ठाकरे यांच्या गटाचाही प्रयत्न सुरू झालेला आहे. राज ठाकरे यांना बरोबर घेतल्यास मराठी मते मिळू शकतात, हा ठोकताळा त्यामागे आहे.

**पाच वर्षांनी ताकद दाखवण्याची संधी...**



### उबाठाची आव्हाने, आता घोडा मैदान..

शिवसेनेमध्ये उभी फूट पडल्यानंतर उद्धव ठाकरे आणि त्यांच्या पक्षाचे प्रवक्ते संजय राऊत हे रोज विरोधकांना आव्हान देत आहेत. हिम्मत असेल तर निवडणुका घ्या, हे एकच परवलीचे वाक्य त्यांच्याकडे आहे. पण, त्यानंतर अनेक निकवडणुका होऊन देखील, त्यांची डाळ कुठेही शिजलेली नाही. या उलट, दिवसेंदिवस भारतीय जनता पार्टी ही शक्तिमान होत असून एकनाथ शिंदे आणि अजितदादा यांच्या पक्षांच्या मदतीने मुंबई महानगरपालिका जिंकतील, असे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. गेल्या वेळी सुद्धा शिवसेना आणि भाजपा मध्ये केवळ तीन जागांचा फरक होता आणि भाजपाने शिवसेनेला सत्ता स्थापन करण्यासाठी परवानगी दिली होती.

### निवडणुकांना हिरवा कंदील..

महत्वपूर्ण निर्णय दुपारी आला. राज्यात रखडलेल्या महानगरपालिका आणि नगरपालिका निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वाचा निर्णय देत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येत्या चार महिन्यांत घेण्याचे आदेश दिले आहेत. मुंबई, पुणे, नाशिक, नागपूरसह अनेक महापालिकांमधील तब्बल पाच वर्षांपासून प्रलंबित असलेल्या निवडणुकांना अखेर हिरवा कंदील मिळाला आहे.

### काय म्हणाले न्यायमूर्ती...

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या खंडपीठाने दिलेल्या निर्णयात राज्य निवडणूक आयोगाने चार आठवड्यांत अधिसूचना काढून चार महिन्यांत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करावी, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

### न्यायालयाची भूमिका

हा निर्णय देताना न्यायमूर्ती सूर्यकांत म्हणाले, आजही महाराष्ट्रातील अनेक स्थानिक संस्था प्रशासकांमार्फत चालवल्या जात आहेत. हे लोकशाहीच्या मूळ तत्वांच्या विरोधात आहे. त्यांनी पुढे सांगितले की, आरक्षण हा मुद्दा रेल्वेच्या डब्यासारखा झाला आहे. जे चढलेत, ते इतरांना चढू देत नाहीत. राज्य सरकारने फक्त काही विशिष्ट वर्गांना नव्हे, तर सर्व सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गांना न्याय मिळेल, याची जबाबदारी घेतली पाहिजे.

### राजकीय हालचालींना वेग..

या निर्णयामुळे राज्यातील निवडणूक राजकारणाला वेग येण्याची शक्यता असून, सत्ताधारी आणि विरोधी पक्ष दोघांनाही नव्याने रणनीती आखाव्या लागणार आहेत.

### ‘ओबीसी’ आरक्षणाचा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा !

ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरही न्यायालयाने महत्त्वाचा निर्णय देत, १९९४ ते २०२२ दरम्यानची स्थिती कायम ठेवण्याचे आदेश दिले आहेत. ओबीसी आरक्षणासाठी २०२२ पूर्वीची स्थिती लागू राहील, असे निर्देशात म्हटले आहे. राज्य निवडणूक आयोगानेच निवडणुका घ्याव्यात, राज्य सरकार हस्तक्षेप करू शकत नाही, असा आदेशही देण्यात आला आहे. मुंबई, पुणे, औरंगाबाद, नवी मुंबई येथे पाच वर्षांहून अधिक काळ प्रशासक सत्तेवर आहेत, हे संविधानविरोधी असल्याचे न्यायालयाने मत नोंदविले आहे.

ePaper

## पंतप्रधान मोदींनी 11 वाजता बोलावली सुरक्षा समितीची बैठक

| वर्ष - 8 | अंक - 275 | UDYAM-MH-26-0158827 |

## पाकिस्ताच्या हद्दीत घुसून एअर स्ट्राईक



महाईन्यूज™

www.mahaenews.com | बुधवार, दि. 7 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | ...ची... लोकशाहीच्या हक्काची!



# OPERATION SINDOOR



। नवी दिल्ली । प्रतिनिधी । महाईन्यूज


# पाकिस्तान घाबरलं...

## पाकिस्तानवर हवाई हल्ला ! 9 दहशतवादी तळं उदध्वस्त, भारताची मोठी कारवाई, पाकिस्तानने घेतला धसका...

जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याला भारतीय सैन्याकडून जशास तसं उत्तर देण्यात आलं आहे. भारताकडून बुधवारी मध्यरात्री 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे 9 अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले आहेत.यामध्ये जैश ए मोहम्मदचे सुमारे 50 दहशतवादी ठार तर 33 जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. भारतीय सैन्याच्या या हल्ल्यामुळे पाकिस्तान हदरले आहे. पाकिस्तानने उच्चस्तरीय बैठक बोलावली आहे. भारताकडून सर्व मित्रदेशांना दहशतवादी हल्ल्याची माहिती देण्यात आली. पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर अशा कृत्यांना पाठबळ देणाऱ्या पाकिस्तानला भारतीय हवाई दलाने धडा शिकवला. पाकिस्तान व पाकव्याप्त काश्मीरमध्ये घुसून भारताने एअर स्ट्राईक्स केले. यामुळे पाकिस्तानमध्ये प्रचंड खळबळ निर्माण झाली आहे.

- **शांत रहा, काहीही गोंधळ करू नका, पाकिस्तानला**
- **अमेरिकेने दिला दम; अमेरिका भारतासोबत**
- **भारताला कोणतेही प्रत्युत्तर देऊ नका**

संबंधित वृत्त पान 6 वर







### 'ऑपरेशन सिंदूर', संरक्षण मंत्रालयाची एक्स पोस्ट

गेले दोन आठवडे भारताने पाकिस्तानवर कारवाईचे स्पष्ट संकेत दिले होते. याशिवाय सिंधू नदी पाणी वाटप करार रद्द करण्यापासून पाकिस्तानी नागरिकांना देशातून बाहेर काढण्यापर्यंत विविध उपाययोजनाही करण्यात आल्या होत्या. पण लष्करी कारवाई सुरु केली नव्हती. यामुळे पाकिस्तानही सतत भीतीच्या छायेखालीच होता. संयुक्त राष्ट्र समितीच्या अधिकाऱ्यांनी पाकिस्तानला सांगितले आहे की, भारताच्या या हल्ल्याला कोणत्याही प्रकारचे प्रत्युत्तर देऊ नका. अन्यथा मोठे युद्ध होईल. भारताने शेजारी देशासह सुरू असलेल्या या तणावादरम्यान बुधवारी मध्यरात्री (7 मे) पाकव्याप्त काश्मीरमधील 9 दहशतवादी तळांवर क्षेपणास्त्रे डागली आहेत. भारतीय सैन्याने पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या 15 दिवसांनी ही कारवाई केली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, भारताने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील (POK) दहशतवादी तळांवर हवाई हल्ले केले आहेत. ही तीच ठिकाणे आहेत जिथून भारतावर दहशतवादी हल्ले करण्याचे निर्देश दिले गेले होते. दरम्यान या हल्ल्यात काय काय नुकसान झालंय, याबाबत माहिती समजू शकलेली नाही. भारतीय सैन्य दलाकडून 'ऑपरेशन सिंदूर' नुसार (Operation Sindoor) ही कारवाई करण्यात आली आहे.

### 'ऑपरेशन सिंदूर'नंतर पाकिस्तान हादरलं

भारतीय सैन्य दलाच्या ऑपरेशन सिंदूर अंतर्गत करण्यात आलेल्या कारवाईनंतर पाकिस्तान हादरलं आहे. भारताने मुजफ्फराबाद, कोटली आणि बहावलपूरमध्ये मोठा क्षेपणास्त्र हल्ला करण्यात आला. पाकिस्तानी माध्यमांच्या दाव्यानंतर काही वेळातच भारत सरकारनेही या हल्ल्याची अधिकृतपणे पुष्टी केली.

भारतीय सैन्य दलाकडून हवाई हल्ल्याआधी सोशल मीडियावरुन एक पोस्ट करण्यात आली होती. "प्रहाराय सन्निहिताः, जयाय प्रशिक्षिताः" आणि Ready to Strike, Trained to Win", अशा आशयाची पोस्ट करण्यात आली होती. सैन्य दलाने केलेल्या या कारवाईचं आता सर्वच स्तरातून कौतुक केलं जात आहे.

### नक्की कोणत्या ठिकाणी एअर स्ट्राईक

भारतीय सैन्याकडून पाकव्याप्त काश्मीर तसेच बहावलपूर, कोटली आणि मुझफ्फराबादमधील ठिकाणांना लक्ष्य करण्यात आलं आहे. याच ठिकाणांहून भारतावर दहशतवादी हल्ला करण्याचा कट रचला गेला होता. भारताकडून करण्यात आलेल्या या एअर स्ट्राईकनंतर पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी अकलेचे तारे तोडले आहेत. "भारत महिला आणि मुलांवर गोळीबार करत आहे. मशिदी उद्ध्वस्त करण्यात आल्या आहेत", असं मंत्री ख्वाजा आसिफ यांनी म्हटलं. मात्र भारताकडून ही एअर स्ट्राईक फक्त दहशतवादांच्या तळांवर करण्यात आली आहे.

# पुरंदरमध्ये माझी एक इंचही जमीन नाही!

## विरोध असल्यास बळजबरी करण्यात येऊ नये : खासदार सुळे

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुरंदर येथील नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या परिसरात ११२ एकर जमीन असल्याच्या आरोपाचे खासदार सुप्रिया सुळे यांनी खंडन करून, 'पुरंदरमध्ये माझ्यासह ज्येष्ठ नेते शरद पवार, प्रतिभा पवार, सदानंद सुळे यांच्या नावावर एक इंचही जमीन नाही,' असे स्पष्ट केले.**



नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूसंपादनासाठी गेलेल्या जिल्हा प्रशासनाचे पथक आणि ग्रामस्थांमध्ये कुंभारवळण येथे वाद झाला. त्या वेळी पोलिसांनी लाठीमार केला. त्यामध्ये काही ग्रामस्थ जखमी झाले. याप्रकरणी आंदोलकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर खासदार सुळे यांनी कुंभारवळण येथे भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला. त्या वेळी एका शेतकऱ्याने 'या भागामध्ये आपल्या नावावर ११२ एकर जमीन असल्याची चर्चा आहे. ती खरी आहे का?' असा प्रश्न विचारला. त्या वेळी खासदार सुळे म्हणाल्या, 'माझी एक इंचही जमीन पुरंदरमध्ये नाही. असेल तर मी ती तुम्हाला देते. ज्येष्ठ नेते शरद पवार, प्रतिभा पवार, सदानंद सुळे किंवा माझ्या नावावर या तालुक्यात जमीन नाही.'दरम्यान, कुंभारवळण येथील ज्येष्ठ महिला अंजनाबाई कामठे यांचे राहत्या घरी निधन झाले. कामठे परिवाराचे खासदार सुळे यांनी सांत्वन केले. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते सुदाम इंगळे, तालुकाध्यक्ष माणिक झेंडे, विजय कोलते आदी उपस्थित होते.विमानतळाला विरोध करण्यासाठी सात गावांमधील सर्वांना बरोबर घेऊन शेतकऱ्यांची कृती समिती स्थापन करा. त्यामध्ये प्रत्येक गावातील दोघांचा समावेश करण्यात यावा. या समितीमध्ये स्वतः काम करण्यास तयार आहे. समितीच्या माध्यमातून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री यांची भेट घेऊन प्रश्न सोडविण्यासाठी सोबत राहणार आहे, असे खासदार सुळे यांनी सांगितले.'विमानतळाला विरोध नाही. मात्र, जागेला विरोध आहे. शेतकरी जमीन द्यायला तयार असलेल्या भागातच विमानतळ करावे. लोकांचा विरोध असल्यास बळजबरी करण्यात येऊ नये, अशी माझी भूमिका आहे,' असे खासदार सुळे यांनी स्पष्ट केले.नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूसंपादनासाठी गेलेल्या जिल्हा प्रशासनाचे पथक आणि ग्रामस्थांमध्ये कुंभारवळण येथे वाद झाला. त्या वेळी पोलिसांनी लाठीमार केला. त्यामध्ये काही ग्रामस्थ जखमी झाले. याप्रकरणी आंदोलकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर खासदार सुळे यांनी कुंभारवळण येथे भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला. त्या वेळी एका शेतकऱ्याने 'या भागामध्ये आपल्या नावावर ११२ एकर जमीन असल्याची चर्चा आहे. ती खरी आहे का?' असा प्रश्न विचारला.

### आंदोलकांविरुद्ध गुन्हे दाखल

त्या वेळी खासदार सुळे म्हणाल्या, 'माझी एक इंचही जमीन पुरंदरमध्ये नाही. असेल तर मी ती तुम्हाला देते. ज्येष्ठ नेते शरद पवार, प्रतिभा पवार, सदानंद सुळे किंवा माझ्या नावावर या तालुक्यात जमीन नाही.'दरम्यान, कुंभारवळण येथील ज्येष्ठ महिला अंजनाबाई कामठे यांचे राहत्या घरी निधन झाले. कामठे परिवाराचे खासदार सुळे यांनी सांत्वन केले. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते सुदाम इंगळे, तालुकाध्यक्ष माणिक झेंडे, विजय कोलते आदी उपस्थित होते.विमानतळाला विरोध करण्यासाठी सात गावांमधील सर्वांना बरोबर घेऊन शेतकऱ्यांची कृती समिती स्थापन करा. त्यामध्ये प्रत्येक गावातील दोघांचा समावेश करण्यात यावा.

# मुलाच्या मृत्यूचा वडिलांनी घेतला बदला!

## भावासह सात जणांची हत्या करत मृतदेह भीमा नदीत फेकले

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जानेवारी २०२३ मध्ये पुण्यातल्या दौंड तालुक्यात भीमा नदीतून आणि एका विहिरीतून एकाच कुटुंबातल्या सात जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले होते. पुणे ग्रामीण पोलिसांनी या प्रकरणाचा कसून तपास केला तेव्हा या सातही जणांची हत्या त्यांच्या एका नातेवाईकानेच केल्याची बाब समोर आली. या प्रकरणी पाच जणांसह एका अल्पवयीन मुलाला अटक करण्यात आली. हे प्रकरण काय आहे? पोलिसांनी गुन्ह्याची उकल कशी केली? आपण जाणून घेऊ,**



पोलिसांच्या FIR नुसार २५ जानेवारी २०२३ च्या दिवशी सब इनस्पेक्टर संजय नागरगोजे यांना १८ जानेवारी २०२३ च्या दुपारी १२.३० ला परगाव येथील एका नदीत एका अनोळखी महिलेचा मृतदेह मिळाला. त्यानंतर २० जानेवारी त्याच ठिकाणी एका पुरुषाचा मृतदेह मिळाला. २२ जानेवारी २०२३ ला आणखी दोन मृतदेह मिळाले. त्यातला एक मृतदेह महिलेचा होता. महिलेच्या मृतदेहावरुन पोलिसांना हे समजलं की ती महिला बीडमधल्ये गेवराईची रहिवासी होती आणि तिचं नाव संगीता मोहन पवार असं होतं. पोलिसांनी २०२३ मध्ये तिच्या नातेवाईकांना शोधलं आणि त्यांच्याशी संपर्क साधला. त्यावेळी इतर तीन मृतदेहांची ओळखही पटली. ते मृतदेह मोहन उत्तम पवार (संगिता पवारचा नवरा), संगिता आणि मोहन यांचा जावई शामराव फुलवारे आणि मुलगी राणी फुलवारे यांचे होते. शामराव आणि राणी हे दोघंही उस्मानाबाद जिल्ह्यातील हाटोळे गावात राहात होते. मोहन पवार हे त्यांची पत्नी, मुलगी, जावई आणि तीन नातवंडं यांच्यासह नगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील निघोज इथे राहत होते.सातपैकी चारही मृतदेहांवर कोणत्याही स्वरूपाच्या जखमा नसल्याचंही पोलिसांनी स्पष्ट केलं होतं.पुणे ग्रामीण पोलिसांनी या प्रकरणाचा तपास केला. त्यानंतर पोलिसांना कळलं की या सगळ्या हत्या या लोकांच्या नातेवाईकानेच केली होती. त्यानंतर या हत्या प्रकरणात पोलिसांनी पाच जणांना अटक केली. त्यानंतर हेदेखील कळलं की शामराव आणि राणी यांना तीन मुलं आहेत आणि तिघंही बेपत्ता आहेत. त्यांचा शोध सुरु केल्यानंतर रितेश, छोटू आणि कृष्णा या तिघांचे म्हणजेच राणी आणि शामरावच्या मुलांचेच मृतदेह होते. त्यामुळे एकाच कुटुंबातल्या सात जणांची हत्या झाली ही बाब समोर आली.आरोपी अशोक पवार याचा मुलगा धनंजय पवार यांचा अपघातात मृत्यू झाला होता. मात्र धनंजयच्या अपघाताला हे पवार कुटुंब कारणीभूत होतं, असा समज आरोपींचा होता. याच रागातून ओरपींनी ही हत्या केली. करणी किंवा काळू जादू यातून हे मृत्यू झाल्याचा अंदाज आधी वर्तवण्यात आला होता. मात्र पोलीस तपासात हा अंदाज खोटा ठरला असून, ठरवून केलेले हत्याकांड असल्याचे उघड झाले.

### पोलिसांना पुरावे हाती लागले

मात्र भावाबाबत मनात असलेला राग आणि त्याच्यामुळेच आपला मुलगा गेल्याचा संशय या सगळ्याची जागा सुडाने घेतली आणि अशोक आणि त्याच्या कुटुंबाने मोहन आणि संगिता यांच्यासह त्यांचं सगळं कुटुंब संपवलं. प्रकरणाचं गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी या घटनेचा तपास करण्यासाठी अनेक पथकं तयार केली होती. तपासादरम्यान पोलिसांना काही पुरावे हाती लागले.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बिगुल वाजला

# साडेतीन वर्षानंतर पिंपरी चिंचवड महापालिकेची निवडणूक दृष्टिक्षेपात!

## सर्वोच्च न्यायालयाचा निकाल; प्रभाग रचनेबाबत उत्सुकता

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्याच्या आत घ्या असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर आता पुन्हा एकदा या निवडणुकांचा बिगुल वाजला असून आपापल्या नेत्यांसाठी झटणारे कार्यकर्ते आता खऱ्या अर्थाने स्वतःच्या निवडणुकीसाठी कामाला लागणार आहेत. दुसऱ्या फळीतील कार्यकर्त्यांसाठी महत्त्वाची समजली जाणारी महापालिका निवडणूक तब्बल साडेतीन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर दृष्टिक्षेपात आली आहे.**



पिंपरी-चिंचवड महापालिकेची मुदत १४ मार्च २०२२ मध्ये संपुष्टात आल्यानंतर महापालिकेत प्रशासकीय राजवट लागू झाली. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर २०२१ पासून निवडणूक प्रक्रिया सुरू केली होती. प्रभाग रचना कशी आणि सदस्यांची संख्या यावरून आणि ओबीसी आरक्षण यामुळे साडेतीन वर्षे निवडणूक प्रक्रिया रखडली. मध्यंतरी सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी वगळून निवडणुका घेण्याचे आदेश सुरुवातीला दिले.

### निवडणुकीसंदर्भात वारंवार बदल

राज्यात रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरात लवकर घेण्याचा आदेश यापूर्वीही एकदा सर्वोच्च न्यायालयाने दिलेला असताना पुन्हा महापालिका तसेच जिल्हा परिषदांच्या सदस्य संख्येचे गुऱ्हाळ सुरू झाले. गेल्या तीन-चार वर्षात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात वारंवार बदल करण्यात आले आहेत. पुन्हा प्रभाग रचना, प्रभागांचे आरक्षण आणि पुन्हा नव्याने सोडत ही सर्कस पुढल्या काळात दिसून येणार आहे.

पहिल्यांदा अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी आरक्षण सोडत काढली. त्यानंतर राज्यात सत्तांतर झाल्यानंतर भाजप आणि एकनाथ शिंदे यांचे सरकार आल्यानंतर ओबीसींसह आरक्षण सोडत काढण्याचे आदेश आले. त्यानंतर ११४ जागांपैकी आरक्षित प्रभागांची सोडत काढली गेली. पुढे तीन सदस्यीय पद्धतीला आव्हान देत ती रद्द करण्यात आली. आरक्षण सोडतीनंतर सर्वच प्रक्रिया रद्द करण्यात आली. त्यानंतर लोकसभा आणि विधानसभा तसेच अन्य निवडणुकांमुळे प्रक्रिया लांबणीवर पडली.

---

## तीन की चार सदस्यीय पद्धतीने निवडणूक होणार?

# निकालाचा उत्साह; इच्छुक, कार्यकर्ते अजूनही गॅसवरच

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या साडेतीन वर्षांपासून रखडलेली महापालिकेची निवडणूक घेण्याचा मार्ग मोकळा झाल्यानंतर आता तीन की चार सदस्यीय पद्धतीने ही निवडणूक होणार याकडे इच्छुकांचे लक्ष लागले आहे. तत्कालीन महाविकास आघाडीने तीन सदस्यीय पद्धतीने निवडणूक घेण्याचा घेतलेला निर्णय तत्कालीन शिवसेना-भाजप सरकारने बदलला होता. तसेच नगरसेवकांची संख्या वाढणार की पूर्वीप्रमाणेच १२८ राहणार याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.**



> राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाची निवडणुका लढण्याची तयारी झाली आहे. महाविकास आघाडी किंवा पक्ष आदेशाप्रमाणे स्वतंत्र निवडणुका लढून महापालिका जिंकण्यासाठी कार्यकर्ते सज्ज आहेत.
>
> - **तुषार कामठे,** शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)

> राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही केली जाईल. अद्याप कोणत्याची सूचना देण्यात आलेल्या नाहीत.
>
> -**अविनाश शिंदे, सहायक आयुक्त, निवडणूक विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका**

महापालिकेतील लोकनियुक्त प्रतिनिधींची मुदत १३ मार्च २०२२ रोजी संपली. मात्र, करोना प्रतिबंधक नियम, राज्यातील बदलत्या राजकीय घडामोडी, ओबीसी आरक्षणाचा न्यायप्रविष्ट मुद्दा, अशा विविध कारणांमुळे महापालिका

### 2017 मधील पक्षीय बलाबल

- भाजप – ७७
- राष्ट्रवादी काँग्रेस – ३६
- शिवसेना – ९
- मनसे – १
- अपक्ष – ५

निवडणूक तीन वर्षांपासून लांबणीवर पडली आहे. ती आता सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यात होण्याची शक्यता आहे. २०१७ च्या निवडणुकीत सतरा लाख लोकसंख्येला महापालिकेत १२८ नगरसेवक आणि ३२ प्रभाग होते. २०११ च्या जनगणनेनुसार शहराची लोकसंख्या सतरा लाख २९ हजार ३५९ आहे.

सध्याची लोकसंख्या तीस लाखांवर गेली असल्याचा प्रशासनाचा अंदाज आहे. त्यामुळे नगरसेवकांची संख्या वाढणार की पूर्वीप्रमाणेच राहणार याकडे इच्छुकांचे लक्ष लागले आहे. शहरात भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) प्रतिस्पर्धी आहेत. २०१७ मध्ये भाजपने राष्ट्रवादीकडून महापालिकेतील सत्ता खेचून घेतली. आता अजित पवार हे भाजपसोबत आहेत. त्यामुळे दोन्ही पक्ष महापालिका ताब्यात घेण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यामुळे महायुती आणि महाविकास आघाडी एकत्रित लढणार की स्वबळावर याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

### पिंपरी-चिंचवडमध्ये प्रभागरचना 'जैसे थे'

**पिंपरीत 32 प्रभाग, नगरसेवक 128**


गेल्या तीन वर्षांपासून रखडलेला महापालिकेची निवडणूक घेण्याचा मार्ग मोकळा झाला असून, पिंपरी-चिंचवडमध्ये प्रभागरचना 'जैसे थे' राहणार आहे. २०१७ प्रमाणे चार सदस्यीय पद्धतीने निवडणूक होणार असून, ३२ प्रभाग आणि नगरसेवकांची संख्या पूर्वीप्रमाणेच १२८ राहण्याची शक्यता आहे.

### आजपर्यंतची प्रभाग पद्धती

महापालिकेची स्थापना १९८२ मध्ये झाली. मात्र, १९८६ पर्यंत प्रशासकीय राजवट होती.

**१९८६** – पहिली निवडणूक झाली. तेव्हा, एक सदस्यीय प्रभाग पद्धती व ६० प्रभाग
**१९९२** – निवडणुकीत एक सदस्यीय प्रभाग पद्धती व ७८ प्रभाग
**१९९७** – निवडणुकीत एक सदस्यीय प्रभाग पद्धती व ७९ प्रभाग
**२००२** – तीन सदस्यीय प्रभाग पद्धती व ३५ प्रभाग होते, नगरसेवक संख्या १०५
**२००७** – एक सदस्यीय प्रभाग पद्धती व नगरसेवक संख्या १०५
**२०१२** – द्विसदस्यीय प्रभाग पद्धती व ६४ प्रभाग होते, नगरसेवक संख्या १२८
**२०१७** – चार सदस्यीय प्रभाग पद्धती व ३२ प्रभाग होते, नगरसेवक संख्या १२८

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### स्वार्थ आवरल्याने परस्परप्रेम वाढते.

**परस्परात प्रेम वाढविण्यासाठी काही गोष्टी आवश्यक आहेत. एक, बारीकसारीक गोष्टींकडे दुर्लक्ष करून प्रत्येकाच्या स्वभावाला थोडी थोडी सवलत ठेवावी; म्हणजे द्वेष वाटणार नाही. दुसरी, सर्वांना प्रेमाची अशी जी एखादी जागा असेल त्याकडे दृष्टी ठेवावी. तिसरी, कोणतीही सूचना सांगायची झाली, तर त्या व्यक्तीविषयक न बोलता, नम्रतेने आणि गोड शब्दांत सांगावी. चौथी, अत्यंत महत्त्वाची गोष्ट, जीमध्ये या सर्वांचा बऱ्याच प्रमाणात अंतर्भाव होतो अशी बाब, म्हणजे स्वार्थाला आळा घालणे, म्हणजे, मी स्वत: जितका माझ्याकरिता आहे असे वाटते, त्याच्याहीपेक्षा जास्त मी दुसऱ्याकरिता आहे असे वाटणे ही होय. आणि ही जाणीव ठेवून त्याप्रमाणे वागणे हेच प्रेम वाढवायला मदत करते. ज्या माणसाला स्वार्थ साधायचा नाही त्याला कमी पडणे शक्यच नाही. जिथे नि:स्वार्थीपणा आहे तिथे भगवंताला पुरवठा केलाच पाहिजे.आता स्वार्थाचा विचार करताना असे सहज वाटते की, मी कुठे स्वार्थी आहे ? मी कुठे कुणाजवळ काय मागतो ? पण एवढ्याने 'स्वार्थदृष्टी नाही' असे म्हणता येणार नाही. अहंकाराइतकाच स्वार्थ जबरदस्त आहे. त्याच्या मुळ्या इतक्या खोल आणि सूक्ष्म असतात की, त्यांचा पत्ताच लागत नाही. स्वार्थ तीन प्रकारचा असू शकतो; कायिक, वाचिक आणि मानसिक. देहाला दुसऱ्यानिमित्त कष्ट न होतील इतक्या काळजीने वागणे, हा कायिक स्वार्थ म्हणतात. माझ्या बोलण्याला सर्वांनी मान डोलवावी, मी कोणाला काही कमीजास्त बोललो तरी ते त्याने निमूटपणे सहन करावे, अशा तऱ्हेच्या वृत्तीला वाचिक स्वार्थ म्हणता येईल. आणि माझ्या मताप्रमाणे सर्वांनी वागावे, माझे विचार बरोबर आहेत अशी जाणीव इतरांनी ठेवावी, अशा तऱ्हेची आपली इच्छा, त्याला मानसिक स्वार्थ म्हणता येईल. आता, मी माझ्याकरिता जितका असेन त्याहून जास्त मी दुसऱ्याकरिता आहे, असा विचार केला तर असे दिसून येईल की, मी जेवढी मला स्वत:ला सवड ठेवतो, तेवढीच किंवा त्याच्याहून थोडी जास्त सवड दुसऱ्याला ठेवणे जरूर आहे. म्हणजेच, जे दुसऱ्याने आपल्या बाबतीत करणे आपल्याला बरे वाटत नाही, ते आपण दुसऱ्याच्या बाबतीत न करणे; आणि त्याच्याच उलट, जे दुसऱ्याने आपल्याला केले तर बरे वाटते तेच आपण दुसऱ्याच्या बाबतीत करावे. हेच सर्वांचे सार आहे आणि हाच धर्म आहे. आपण जगावर प्रेम केल्याशिवाय परत प्रेम मिळणार नाही. आपण पुष्कळांच्यावर प्रेम केले तर आपण एकटेच त्यांचे करतो, पण प्रसंगाला ते सर्व आपल्याला मदत करतात. जो पुष्कळांचा झाला तोच भगवंताचा झाला असे समजावे.**

**बोधवचन:- जो निःस्वार्थ बुद्धीने प्रेम करतो त्याला आनंद खास मिळतो.**



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# धमक्या झाल्या, इशारे झाले, आता, युद्ध उंबरठ्यावर आले!

**केंद्र सरकार आणि सुरक्षा यंत्रणांनी सात मे रोजी 'मॉक ड्रिल' चा एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. पाकिस्तान विरोधातील युद्ध सुरू झाले, तर युद्धजन्य परिस्थिती कशी असते ? हे नागरिकांना समजावे यासाठी या ड्रिलचे प्रयोजन करण्यात आले आहे.**

### बेजबाबदार देशद्रोही नेते...

नव्या पिढ्यांना याचा निश्चित फायदा होणार आहे. एकीकडे, पाकिस्तानला धडा शिकविण्याची मागणी करताना केंद्र सरकारची फजिती झाली तर हवीच असणारा एक मोठा वर्ग, काही राजकीय पक्ष आणि त्यांचे प्रवक्ते देशात आहेत. काँग्रेस पक्षाने केंद्र सरकारला पाठिंबा देण्याची घोषणा केली असली तरी अजय राय यासारखे अत्यंत बेजबाबदार नेते काँग्रेस पक्षात आहेत. दुसरीकडे इंदिरा गांधी यांनी पाकिस्तानचे दोन तुकडे केले, वगैरे गोष्टी गौरवाने सांगताना बांगलादेश निर्मितीचे साईड इफेक्ट आपण भोगत आहोत ,आणि त्या काळात आलेले लाखो बांगलादेशी भारताचे नागरिक झाले होते, त्याचे परिणाम देखील आपण भोगत आहोत, हे लक्षात घ्यायला हवे!

### काहींना पूर्वीचे युद्ध आठवेल...

भारताच्या संरक्षण क्षेत्रावर अधिकार वाणीने लिहिण्याएवढा तज्ज्ञ मी नक्कीच नाही. घरात एसी मध्ये बसायचे आणि जगाला सल्ला द्यायचा, हा धंदा करायला, मी उबाठा गटाचा प्रवक्ता तर नक्कीच नाही !त्यामुळे, अजून पाकिस्तानात भारतीय लष्कर कसे घुसले नाही, असे फालतू प्रश्न मी विचारणार नाही. सरकारने युद्धजन्य परिस्थितीत जनतेची भूमिका काय असावी, याचा सखोल विचार केलेला आहे. आज सत्तरी ओलांडलेल्या लोकांना १९६५ चे युद्ध आठवत असेल. त्या वेळी सकाळी दहा वाजता भोंगा वाजायचा, तो युद्धाचा इशारा असायचा. शाळेत मुले मुली सुरक्षित ठिकाणी लपायची. त्या काळात देखील शत्रू आपल्या जवळपास कुठेतरी लपलेला असायचा. आज परिस्थितीत फारसा बदल झालेला नाही. उलट लोकसंख्या वाढलेली असल्याने शत्रूला लपण्यासाठी जागा अधिक आहेत, हे लक्षात घ्यायला हवे !



### आर्थिकदृष्ट्या भारत बळकट..

आर्थिक पातळीवर भारताची परिस्थिती अत्यंत चांगली आहे. म्हणजे, खजिन्यात बऱ्यापैकी पैसा आणि सोन्याचा प्रचंड साठा आहे. तरीही युद्ध करुन यातील संपत्ती कमी करायची किंवा कसे याचा सरकारला विचार करावा लागतो, म्हणून पाकिस्तानच्या विरोधात करण्याच्या कारवाईची प्रतीक्षा करणे योग्य ठरेल. इस्राईल किंवा रशिया जसे हल्ले करतात आणि महिनोन्महिने युद्ध खेळत बसतात, तसे भारतीय नेतृत्व अजिबात करणार नाही, याची खात्री आहे. फक्त शत्रूला जेरीस आणण्याचे जोरदार उपाय करण्यात आले आहेत. भारताने युद्धात उतरावे आणि त्यात उभय बाजूंची हानी व्हावी, हीच जगातील अनेक देशांची भूमिका आहे. चीनबरोबर सध्या थोडीफार मैत्री झाली आहे, असे दिसत असले तरी चीन हा उलटणारा देश आहे. पाकिस्तान दळभद्री आहे. पण, असे युद्ध वगैरे झाले तर कुरापती काढण्याची संधी चीन नक्कीच सोडणार नाही. पण युद्धात जेवढी हानी होणार नाही, त्यापेक्षा अधिक हानी पाकिस्तानची केवळ युद्धजन्य परिस्थिती असल्याने झाली आहे आणि होत आहे, याचा साधारण अंदाज आला आहे. युद्धात नुकसान झाले आणि अन्नान्न दशा झाली की जगभरात भीक मागायला पाकिस्तान मोकळा आहे. भारतावर अशी नक्कीच वेळ येणार नाही !

### सुरक्षा यंत्रणेच्या पाठीशी उभे राहा..

या सर्व पार्श्वभूमीवर, एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी की देशात मोठ्या प्रमाणात आर्थिक संपन्नता प्राप्त झालेला मोठा वर्ग आहे. या वर्गाला आपले आर्थिक हितसंबंध बिघडणे परवडणारे नाही. तरीही देशभक्ती मनात असेल तेव्हा हे हितसंबंध बाजूला ठेवले जातात. युद्ध करायचे असेल, तेव्हा सीमेवर असलेल्या जवान आणि अधिकारी यांना करावे लागते. एक अधिकारी किंवा एक सैनिक घडवणे, हे साधे काम नाही, तब्येतीने दणदणीत असलेले हे लोक असतात. ते शेतात राबले तरी उत्पन्न दुप्पट काढण्याची क्षमता असते. एखाद्या वसाहतीत चार जवान राहात असतील तर सगळ्यांना सुरक्षित असल्यासारखे वाटते. एक निवृत्त जवान गावात राहायला आला तर गावाला नवा मार्ग दाखवतो. अशा जवानांच्या पाठीशी उभे राहाणे हे जनसामान्यांचे कर्तव्य असते. टोपीवर लाल तुरा असलेला जवान बघितला, तरी आपल्याला सुखावह वाटते. अशा संरक्षण क्षेत्रांत काम करणाऱ्या लोकांच्या पाठीशी उभे राहणे आपले कर्तव्य आहे. त्यासाठी 'सिक्युरिटी ड्रिल' असते. सरकारच्या प्रयत्नांना आपण साथ देऊ या.

### अभ्यासू पंतप्रधान, हे आपले सुदैव !

आपल्या देशाला एक अभ्यासू आणि दूरदृष्टीचा पंतप्रधान मिळाला आहे हे आपले खरोखर सुदैव म्हणावे लागेल. रोज अनेक अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा, होणाऱ्या संभाव्य युद्धाचे नियोजन, देशवासीयांची सुरक्षा, आणि कोणत्याही परिस्थितीत अडचणीत न येण्यासाठी केलेले डावपेच आपण रोजच पाहत आहोत, अनुभवत आहोत. पाकिस्तानचे निम्मे मंत्री देशातून पळून गेले आहेत, नागरिकांना अक्षरशः वाऱ्यावर सोडून गायब झाले आहेत ! युद्धाच्या वेळी असले बेजबाबदार अधिकारी काय कामाचे ?

### देशद्रोह्यांना चाप बसवा..

एकीकडे केंद्रातील सत्ताधारी सरकारच्या पाठीशी आपण आहोत, असे सांगणारे याच सरकारवर अत्यंत खालच्या थरावर जाऊन टीका करत आहेत, हे जास्त क्लेशदायक आहे. जी काही बुद्धी आहे ती केंद्र सरकारच्या विरोधात गरळ ओकण्यासाठी आहे, असे काहींचे म्हणणे आहे किंवा समज आहे. या युद्धजन्य परिस्थितीच्या काळात आणि शत्रू उंबरठ्यावर येऊन थांबलेला असताना अशा देशद्रोही मंडळींना चाप लावणे गरजेचे आहे, बघू या त्यासाठी केंद्रातील मोदी सरकार काही पावले उचलणार का ? एक गोष्ट नक्की आहे की बाहेरच्या उघड शत्रूपेक्षा घरातले छुपे शत्रू जास्त धोकादायक असतात हे नक्की !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# व्यापारतूट रोखण्यास इच्छाशक्तीचे इंधन




**सध्या देशाची वाढणारी व्यापारतूट भविष्यातील संकटांची पूर्वकल्पना देत आहे. व्यापारतुटीमुळे अनेक अनर्थ ओढवतात. त्यामुळे वेळीच सावध होऊन धोरणात्मक पावले उचलली पाहिजेत. निर्यातवाढीवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. त्यासाठी व्यापक उपाययोजनांची गरज आहे.**

भारताची आंतरराष्ट्रीय स्तरावरील घोडदौड सध्या जोरात चालू आहे, भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर सातत्याने परदेश दौरे करून आंतरराष्ट्रीय संबंध वाढण्यावर, ते अधिक बळकट करण्यावर भर देत आहेत. काही दिवसांपूर्वी त्यांनी म्यानमार आणि नेपाळचा दौरा केला. नेपाळमध्ये तर त्यांनी भारतीय अनुदानावर तेथील ऊर्जानिर्मितीच्या प्रकल्पाला मोठे सहाय्यसुद्धा जाहीर केले; तर दुसरीकडे भारताचे वाणिज्य मंत्री पीयुष गोयल वेगवेगळ्या देशांशी व्यापार करार करण्यासाठी शिकस्त करत आहेत. नुकतेच भारत-ऑस्ट्रेलिया व्यापार करार स्वीकारल्याच्या घटनेला एक वर्ष पूर्ण झाले. काही दिवसांपूर्वीच भारताचे इतर देशांबद्दलच्या व्यापार तुटीचा अहवाल एका वृत्तवाहिनीने जाहीर केला. त्या अहवालानुसार दहा प्रमुख देशांपैकी नऊ देशांबरोबर भारताची व्यापार तूट मोठी असल्याचे निदर्शनास आले आहे. व्यापार तूट म्हणजे, भारतात येणाऱ्या आयात वस्तू आणि त्याची किंमत ही भारतातून निर्यात होणाऱ्या वस्तूंच्या किमतीपेक्षा



अधिक असणे असा आहे. थोडक्यात आयात अधिक आणि निर्यात कमी अशी परिस्थिती जेव्हा निर्माण होते तेव्हा व्यापारतूट निर्माण झाली असे म्हटले जाते. सध्या भारताची व्यापार तूट फार मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे, असे हा अहवाल सांगतो. केवळ अमेरिकेबरोबरच भारताची व्यापार तूट नसल्याचे सदर अहवालात म्हटले आहे. व्यापार तुटीबाबत सोप्या भाषेत बोलायचे झाल्यास जेव्हा एखादा देश निर्यातीपेक्षा जास्त वस्तू आणि सेवा आयात करतो, तेव्हा व्यापारतूट निर्माण होते. दुसऱ्या शब्दांत, हे त्या रकमेचे प्रतिनिधित्व करते ज्याद्वारे देशाच्या आयातीचे मूल्य एका विशिष्ट कालावधीत, विशेषतः एका वर्षात त्याच्या निर्यातीच्या मूल्यापेक्षा जास्त असते. यामुळे अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते की, एखादा देश त्याच्या निर्यातीतून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा परदेशी वस्तू आणि सेवांवर जास्त खर्च करत आहे, ज्याचे विविध आर्थिक परिणाम होऊ शकतात. खासकरून व्यापारतूट देशाच्या अर्थव्यवस्थेवर अनेक प्रकारे परिणाम करू शकते. त्यामध्ये चलन घसरण ही प्रामुख्याने घडणारी घटना होय. सततच्या व्यापार तुटींमुळे देशाच्या चलनाच्या मूल्यावर घसरणीचा दबाव येऊ शकतो. याचे कारण आयातीसाठी परदेशी चलनांची मागणी वाढलेली असते. त्यामुळे मागणी-पुरवठा धोरणानुसार चलन पुरवठा कमी पडल्याने त्याच्या मूल्यावर परिणाम होतो आणि परिणामतः देशाच्या गंगाजळीवर परिणाम होतो. व्यापारतूट याचा दुसरा महत्त्वाचा परिणाम नोकरी आणि उद्योगांवर होतो. सततच्या व्यापार तुटीमुळे मुख्यतः स्वस्त आयातीमुळे वाढलेल्या स्पर्धेला तोंड देणाऱ्या क्षेत्रांमध्ये नोकऱ्या गमावल्या जाऊ शकतात. जसे की आपण आयात केलेल्या एका वहीची किंमत दहा रुपये असेल आणि आपल्याकडील वहीची किंमत बारा रुपये असेल तर स्पर्धेत टिकण्यासाठी आपल्या वही उत्पादकाला किंमत कमी करावी लागेल. त्यासाठी त्याला खर्चासह कामगारकपातही करावी लागेल. परिणामतः बेरोजगारीसारख्या समस्या देशपातळीवर निर्माण होऊ शकतात. आहे. त्याचबरोबर त्याचा देशांतर्गत उत्पादन क्षेत्रासारख्या उद्योगांवर परिणाम होऊ शकतो. व्यापारतूट एखाद्या देशाला तिसऱ्या परिणामाकडे घेऊन जाऊ शकते. ते म्हणजे कर्ज घेणे. व्यापारतूट भरून काढण्यासाठी एखाद्या देशाला परदेशी संस्थांकडून कर्ज घ्यावे लागू शकते, जसे की जागतिक बँक किंवा आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (आयएमएफ). पण त्या उपायामुळे देशाचे परकी कर्ज वाढते आणि परिणामतः देशाची आर्थिक स्थिती विशेष करून आंतरराष्ट्रीय स्तरावर कमकुवत होते.व्यापार तुटीचा अप्रत्यक्ष संदर्भ देशाच्या स्पर्धात्मकतेवर जोडला जातो. असे मानले जाते की, देशांतर्गत उद्योग जागतिक स्तरावर स्पर्धात्मक नाहीत. म्हणजे भारतीय उत्पादने जगाच्या मागणीनुसार पुरवठा करण्याच्या गुणवत्तेची नसल्याने सदर उत्पादनांचा विचार केला जात नाही किंवा तत्सम आंतरराष्ट्रीय उत्पादनाच्या स्पर्धेमध्ये भारतीय उत्पादकांची पीछेहाट होते. यात विशेष करून किंमत आणि गुणवत्ता या घटकांचा विचार केला जातो.

## प्रासंगिक »

# ‘बारावी’चे बारा!

***विद्यार्थी समाजमाध्यमे आणि ‘एआय’मध्ये गुंतलेले, कनिष्ठ महाविद्यालयांपुढे अनेक प्रश्न अशात बारावीचा निकाल घटणे हे सुचिन्ह मानता येणार नाही...***

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी-बारावीच्या परीक्षांच्या निकालात गुणवत्ता यादी देणे बंद झाले त्याला आता काही वर्षे उलटून गेली. अनावश्यक स्पर्धा आणि त्यातून निर्माण होणाऱ्या ताणाचा विद्यार्थ्यांना त्रास होऊ नये, या उद्देशाने हे केले गेले. तरीही या दोन्ही परीक्षा आणि निकाल यांची ‘हवा’ कमी झाली, असे झालेले नाही. हे; मंत्री लाल दिव्याच्या गाड्यांतून यापुढे हिंडणार नाहीत, या घोषणेसारखे झाले. लाल दिवा गेला; पण बाकीचा झोक तसाच. तसेच बारावी गुणवत्ता यादीचे. दहावीनंतर पुढील करिअरच्या दृष्टीने करावी लागणारी शाखानिवड आणि आता बारावीनंतरच्याही अनेक पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशांसाठी आवश्यक ठरत असलेले बारावीचे गुण, यामुळे दोन्ही परीक्षा आणि त्यांचे निकाल विद्यार्थी आणि पालकांसाठी आपापले महत्त्व अद्याप राखून आहेत.

**वैधानिक प्रकाशन २०२२-२३ मधील ‘बँकिंगचा कल आणि प्रगती’ यावरील अहवाल जारी केला. हा अहवाल बँकिंग क्षेत्राची कामगिरी सादर करतो. त्या निमित्ताने रिझर्व्ह बँकेविषयी दिलेली ठळक निरीक्षणे आणि बँकिंग क्षेत्रासाठी सुचवलेल्या उपाययोजना याचा आढावा.**

# कात टाकणारे बँकिंग क्षेत्र

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया १९५६पासून ‘बँकिंगचा कल आणि प्रगती अहवाल’ प्रत्येक वर्षी प्रसिद्ध करीत असते. ‘रिपोर्ट ऑन ट्रेंड्स अँड प्रोग्रेस ऑफ बँकिंग इन इंडिया’ या अहवालात बँक आणि बँकेतर वित्तीय संस्था यांच्या कार्याचा आणि प्रगतीचा गेल्या आर्थिक वर्षाचा आढावा बँकेने घेतला आहे. बँकिंग आणि वित्तीय क्षेत्राने लवचिकता, नवकल्पना आणि डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने महत्त्वपूर्ण प्रगती केलेली दिसून येते. कोविड काळातील परिणामाच्या चढ-उतारांमधून मार्गक्रमण करताना २०२३ हे वर्ष भारतासाठी अधिक मजबूत आणि तांत्रिकदृष्ट्या प्रगती करण्यात महत्त्वपूर्ण ठरले आहे. धोरणात्मक सुधारणांपासून ते डिजिटल व्यवहारांमध्ये नवीन टप्पे गाठण्यापर्यंत बँकिंग क्षेत्राने वाढीला चालना देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. कोविडनंतर बँकांनी आणि बिगरबँकिंग वित्तीय संस्थांनी



पुन्हा एकदा उभारी घेतली आहे. पतनिर्मिती, पतपुरवठा आणि निधी उभारण्यात देशाच्या विकासात बँका महत्त्वाची भूमिका बजावत असतात. जागतिकीकरणानंतर बँकांबरोबर वित्तीयसंस्था यांनीही पतपुरवठानिर्मिती आणि निधी उभारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. यामुळेच वित्तीय संस्था, सहकारी बँका, व्यावसायिक बँका, व्यापारी बँका यांच्या प्रगतीचा अहवाल ‘आरबीआय’ने बँकेच्या प्रगती अहवालाबरोबर मांडला आहे. भांडवली साठ्यात वाढ: २०२२-२३ मध्ये शेड्युल्ड कमर्शियल बँकांच्या एकत्रित ताळेबंदात १२.२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. बँकांचा क्षेत्रीय पतपुरवठा हा मोठ्या प्रमाणात सेवा क्षेत्राला होत असून बँकेच्या नफ्याचे प्रमाण वाढत आहे. बँकेकडे असणाऱ्या ठेवींचे प्रमाणही दिवसेंदिवस वाढत असून शेड्युल्ड कमर्शियल बँकांचे भांडवल ते जोखीमभारित मालमत्तेचे प्रमाण सप्टेंबर २०२३ च्या अखेरीस १६.८ टक्के होते. याचा अर्थ वित्तीय जोखीमेचा सामना करण्यासाठी बँकांकडे पुरेसा भांडवलसाठा आहे. अनुत्पादक मालमतेच्या प्रमाणात घसरण: बँकेकडे असणाऱ्या अनुत्पादक मालमत्तांचा प्रश्न गंभीर आहे.मागील दोन वर्षांपासून स्थितीत सुधारणा दिसते. रिझर्व्ह बँकेने अनुत्पादक मालमत्तांचे प्रमाण कमी करण्यासाठी काही पावले उचललेली दिसून येतात. त्याचा परिणाम म्हणूनच भारतीय बँकिंग क्षेत्र हळूहळू याच्या विळख्यातून मुक्त होताना दिसून येत आहे. अनुत्पादक मालमतेचे प्रमाण कमी होणे म्हणजेच बँकेकडे भांडवलसाठ्यात वाढ होणे आणि बँकेची नफाक्षमता वाढणे होय.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# रमाबाई आंबेडकर नगरचा पुनर्विकास!

## येत्या 10 -12 दिवसात जागेचा ताबा एमएमआरडीएकडे



।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**घाटकोपरमधील माता रमाबाई आंबेडकर नगर, कामराजनगर पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत पहिल्या टप्प्यातील झोपड्या रिकाम्या करण्याचे काम अखेर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून पूर्ण करण्यात आले आहे. एकूण ७६ एकरपैकी १७ एकर जमीन पहिल्या टप्प्यांत रिकामी करण्यात आली आहे. पाऊणे चार हजार झोपड्या हटविण्यात आल्या आहेत. रिकामी करण्यात आलेली जागा येत्या १०-१२ दिवसात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे (एमएमआरडीए) वर्ग करण्याचे नियोजन झोपु प्राधिकरणाचे आहे.**

एमएमआरडीएकडून पूर्वमुक्त मार्गाचा घाटकोपर ते ठाणे असा विस्तार केला जात आहे. पूर्वमुक्त मार्गाच्या या विस्तारीकरणाच्या कामात घाटकोपर येथील माता रमाबाई आंबेडकर नगरमधील १६९४ झोपड्या बाधित होणार आहेत. त्यामुळे या झोपड्यांच्या पुनर्वसनाचा आणि भूसंपादनाचा प्रश्न गंभीर झाला होता. त्यावर पर्याय म्हणून शेवटी एमएमआरडीएने संपूर्ण रमाबाई नगर आणि कामराज नगरचा पुनर्विकास करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार झोपु प्राधिकरण आणि एमएमआरडीए यांच्याकडून संयुक्त भागीदारी तत्वावर १४ हजार झोपड्यांचा पुनर्विकास केला जात आहे.झोपु प्राधिकरणाकडे पात्रता निश्चिती आणि झोपड्या रिकाम्या करून मोकळी जागा एमएमआरडीएकडे हस्तांतरीत करण्याची जबाबदारी आहे. त्यानुसार झोपु प्राधिकरणाने अंदाजे ११ हजार रहिवाशांची पात्रता निश्चिती केली असून उर्वरित रहिवाशांच्या पात्रता निश्चितीची प्रक्रिया सुरु आहे.

दुसरीकडे पहिल्या टप्प्यात एन-१९ क्षेत्रातील ४०५४ झोपड्यांपैकी अंदाजे ३७५० झोपड्या रिकाम्या केल्या आहेत. पहिल्या टप्प्यात एक उद्यान प्रस्तावित असून तेथील अंदाजे २५० झोपड्या न हटविता ज्या झोपड्या रिकाम्या झाल्या आहेत, त्या काही झोपडीधारकांना तात्पुरती संक्रमण शिबिरातील गाळे म्हणून वापरण्यास दिल्याची माहिती झोपु प्राधिकरणाकडून देण्यात आली आहे. उद्यानाचे बांधकाम करताना या झोपड्या हटवित जागा रिकामी केली जाणार आहे. रमाबाई आंबेडकर नगर आणि कामराज नगरमधील १४ हजार ४५४ झोपड्या एकूण ७६ एकरवर वसलेल्या आहेत. त्यानुसार टप्प्याटप्प्यात ७६ एकर जागेवरील झोपड्या हटवित जागा रिकामी करुन एमएमआरडीएकडे वर्ग केली जाणार आहे. आतापर्यंत पहिल्या टप्प्यात १७ एकर जागा रिकामी करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. येत्या १०-१२ दिवसांत ही जागा एमएमआरडीएकडे वर्ग केली जाईल. त्यानंतर पुढील कार्यवाही एमएमआरडीएकडून केली जाईल असेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.दरम्यान पहिल्या टप्प्यातील झोपड्या यशस्वीपणे हटविण्यात आल्यानंतर आता झोपु प्राधिकरणाकडून दुसर्या टप्प्यातील झोपड्या हटवून जागा रिकामी करुन घेण्याचे काम सुरु करण्यात येणार आहे. येत्या १०-१५ दिवसात दुसऱ्या टप्प्यातील झोपड्या हटविण्याच्या कामाला सुरुवात होईल. या टप्प्यात पूर्वमुक्त मार्गात थेट बाधित होणार्या १६९४ झोपड्या हटविण्यात येणार असल्याचेही अधिकार्यांनी सांगितले. प्रकल्पात थेट बाधित होणाऱ्या झोपड्यांची जागा रिकामी करुन दिल्यास पूर्वमुक्त मार्गाच्या विस्तारीकरण प्रकल्प वेगाने मार्गी लागण्यास मदत होणार आहे. एमएमआरडीएकडून पूर्वमुक्त मार्गाचा घाटकोपर ते ठाणे असा विस्तार केला जात आहे. पूर्वमुक्त मार्गाच्या या विस्तारीकरणाच्या कामात घाटकोपर येथील माता रमाबाई आंबेडकर नगरमधील १६९४ झोपड्या बाधित होणार आहेत.

### पात्रता निश्चितीची प्रक्रिया सुरु

त्यामुळे या झोपड्यांच्या पुनर्वसनाचा आणि भूसंपादनाचा प्रश्न गंभीर झाला होता. त्यावर पर्याय म्हणून शेवटी एमएमआरडीएने संपूर्ण रमाबाई नगर आणि कामराज नगरचा पुनर्विकास करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार झोपु प्राधिकरण आणि एमएमआरडीए यांच्याकडून संयुक्त भागीदारी तत्वावर १४ हजार झोपड्यांचा पुनर्विकास केला जात आहे.झोपु प्राधिकरणाकडे पात्रता निश्चिती आणि झोपड्या रिकाम्या करून मोकळी जागा एमएमआरडीएकडे हस्तांतरीत करण्याची जबाबदारी आहे. त्यानुसार झोपु प्राधिकरणाने अंदाजे ११ हजार रहिवाशांची पात्रता निश्चिती केली असून उर्वरित रहिवाशांच्या पात्रता निश्चितीची प्रक्रिया सुरु आहे.

---

# बहुभाषिक चित्रपट निर्माण करणार!

## मुख्यमंत्र्यांनी कॅबिनेट बैठकीत घेतले महत्त्वाचे निर्णय



।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली अहिल्यानगर येथे ऐतिहासिक राज्य मंत्रिपरिषद घेण्यात आली होती. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. चौंडी येथे अहिल्यादेवी होळकरांचे स्मृतीस्थान जतन आणि संवर्धनाकरता कोट्यवधींचा निधी मंजूर करण्यात आला असून अहिल्यानगर येथे वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.**

कॅबिनेट बैठक संपल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत यासंदर्भातील माहिती दिली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदेही उपस्थित होते."चौंडीला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचं स्मृतीस्थळ जतन आणि संवर्धनाकरता ६८१ कोटींचा आराखडा मान्य केला आहे. यातून विविध प्रकारची कामं होतील. अखिल भारतीय स्तराचं एक प्रेरणास्थळ आणि तीर्थस्थळ म्हणून हे तयार झालं पाहिजे, अशा प्रकारचा प्रयत्न केला आहे. यासोबत त्रिशताब्दीचं औचित्य साधून याच बैठकीत अष्टविनायक गणपती मंदिरांचा जिर्णोद्धार १४७ कोटी रुपये, श्री क्षेत्र तुळजा भवानी मंदिर विकास आराखडा १८६५ कोटी, श्री क्षेत्र ज्योतिबा मंदिर विकास आराखडा २५९ कोटी रुपये, त्र्यंबकेश्वर विकास आराखडा २७५ कोटी रुपये, श्री क्षेत्र महालक्ष्मी मंदिर विकास आराखडा १४४५ कोटी रुपये, श्री क्षेत्र माहुरगड विकास आराखडा ८२९ कोटी रुपये असे जवळपास ५ हजार ५०३ कोटी रुपयांच्या प्रकल्पांना मान्यता दिली आहे", अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत दिली.जे कार्य देशात अहिल्यादेवींनी केलं, तेच कार्य त्यांच्या त्रिशताब्दीनिमित्ताने राज्य सरकारच्या माध्यमातून करत आहोत.

### अहिल्यानगरमध्ये मेडिकल कॉलेज

पुण्यश्लोक अहिल्या देवींचं जीवन आणि कार्य याचा परिचय संपूर्ण जगाला झाला पाहिजे, या करता त्यांच्या जीवनावर बहुभाषिक कर्मशिअल चित्रपट निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे", असं ते म्हणाले.अहिल्यानगर जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करणार.या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय असेल. तसंच, अहिल्यानगरमध्ये खास मुलींकरिता आयटीआय तयार करण्याचा निर्णय करण्यात आला आहे. एक नवीन महिला सक्षमीकरणाकरता आदिशक्ती अभियान राबवण्याचं ठरवलं आहे.महिला सक्षमीकरणाकरता आदिशक्ती अभियान राबवण्याचं ठरवलं आहे. आर्थिक, सामाजिक, आरोग्यविषयक समस्यांबाबत समाजात संवेदनशीलता निर्माण करणे, जागृती करणे हा आपला प्रयत्न असेल. या क्षेत्रात काम करणाऱ्या महिला आणि संस्थांना आदिशक्ती पुरस्कार प्रदान करण्याचा निर्णय घेतला आहे.

# भारतीय सैन्याचं पाकिस्तानला जशास तसं उत्तर!

## अमेरिकेचा पाकिस्तानला दम; अमेरिका भारतासोबत, भारताला कोणतेही प्रत्युत्तर देऊ नका

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**पहलगाममध्ये 22 एप्रिलला झालेल्या दहशतवादी हल्ल्यात निष्पाप 26 भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाला. दहशतवाद्यांनी पर्यटकांवर धर्म विचारुन गोळीबार केला होता. त्या भ्याड हल्ल्यानंतर भारतात संतापाची लाट होती. पाकड्यांना जशास तसं उत्तर द्यावं, अशी मागणी भारतीयांची होती. अखेर भारतीय सैन्य दलाने पाकिस्तानवर हवाई हल्ला करत शेजाऱ्यांच्या नांग्या ठेचल्या आहेत.**



पाकिस्तानवर डिजीटल स्ट्राईक दरम्यान भारताकडून पहलगााम हल्ल्यानंतर पाकिस्तानमधील कलाकार आणि क्रीडापटूंच्या सोशल मीडिया खात्यांवर भारतात बंदी टाकण्यात आली. शाहिद आफ्रिदी, शोएब अख्तर या माजी ~~पाकिस्तान क्रिकेटपटूंच्या यूट्युब~~ चॅनेलवर भारतात बंदी टाकून त्यांची आर्थिक कोंडी करण्यात आली. पाकिस्तानमधील मशीदीमधून घोषणा करण्यात येत आहे. नागरिकांनी घर सोडावं आणि सुरक्षित ठिकाणी जावं, अशी घोषणा पाकिस्तानमधील मशीदीमधून या एअर स्ट्राईकनंतर करण्यात येत आहे. भारताने केलेल्या या कारवाईमुळे पाकिस्तानमध्ये दहशतीचं वातावरण आहे. त्यामुळे मशिदींच्या माध्यमातून नागरिकांना आपलं राहतं घर सोडून सुरक्षित ठिकाणी जावं, असं आवाहन केलं जात आहे. पाकिस्तान सरकारकडून मशिदींच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत हा संदेश पोहचवला जात आहे. सरकारच्या या आवाहनानंतर नागरिक घरातून बाहेर पडत आहेत.

### पाकिस्तानची टरकली

भारताच्या या कारवाईनंतर पाकिस्तानची टरकली आहे. पाकिस्तानच्या लाहोर विमानतळावर आणीबाणी जाहीर करण्यात आली आहे. स्थानिक माध्यमांनुसार, विमानतळावर कडेकोट सुरक्षा ठेवण्यात आली आहे. तसेच प्रवाशांना तात्काळ विमानतळ रिकामं करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. भारताकडून करण्यात आलेल्या या एअर स्ट्राईकनंतर पाकिस्तानकडून अनेक उड्डाणं रद्द करण्यात आली आहेत. तर काही विमानं वळवण्यात आली आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना या एअरस्ट्राईकबद्दल विचारल्यानंतर त्यांनी सांगितलं की, 'आम्ही त्याबद्दल ऐकले आहे. हे लज्जास्पद आहे. मला आशा आहे की हे लवकरच संपेल. दोन शक्तिशाली देशांना युद्धाच्या मार्गावर जाताना कोणीही पाहू शकत नाही. या दोन्ही देशांमधील इतिहास खूप जुना आहे आणि तणाव शिगेला पोहोचला आहे. पण या जगाला युद्धाची नव्हे तर शांतीची गरज आहे.' मला वाटतं लोकांना थोड्याशा भूतकाळाच्या आधारे काहीतरी घडणार आहे हे माहित होतं, असंही ट्रम्प पुढे म्हणाले. वॉशिंग्टनमधील भारतीय दूतावासाने जारी केलेल्या निवेदनानुसार, भारताच्या हवाई हल्ल्यानंतर लगेचच राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांनी अमेरिकेच्या एनएसए आणि परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांना फोन केला आणि त्यांना या प्रकरणाची

### काय आहे ऑपरेशन सिंदूर?

दहशतवाद्यांनी केलेल्या पहलगाम भ्याड हल्ल्याची चीड भारतीयांच्या मनात गेली कित्येक दिवस घर करून होती. दोन आठवडे उलटून गेल्यानंतर कारवाई होत नसल्याने अस्वस्थता होती. पण केंद्र सरकार आणि सैन्य दल या भ्याड हल्ल्याचं प्रत्युत्तर देण्याची जोरदार तयारी करत होतं. दहशवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २५ भारतीय आणि एका नेपाळी नागरिकांचा मृत्यू झाला होता. भारताने या भ्याड हल्ल्याचं चोख प्रत्युत्तर दिलं जाईल हे आधीच स्पष्ट केलं होतं. पण कधी आणि केव्हा हे मात्र निश्चित नव्हतं. अखेर बुधवारी मध्यरात्रीच्या सुमारास भारताने 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी ठिकाणांवर हल्ला केला. या ऑपरेशन अंतर्गत एकूण ९ दहशतवादी ठिकाणांवर हल्ला केला गेला. ही कारवाई योग्य रणनितीनुसार पार पडली. भारताने दहशतवादी ठिकाणं उद्ध्वस्त केली आहेत. या प्रत्युत्तरातून भारताने स्पष्ट संदेश दिला की, दहशतवाद्यांना सोडणार नाहीत. भारत फक्त आता इशारा देत नाही तर कारवाई देखील करतो हा संदेश संपूर्ण जगाला गेला आहे.

#### 'मिशन सिंदूर' नाव का?

पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी हल्ला केला तेव्हा महिलांना सोडून त्यांच्या पतींना मारलं होतं. महिलांच्या कपाळावरचं कुंकू पुसलं होतं. त्यांच्या डोळ्यादेखत त्यांच्या पतींना गोळ्या झाडल्या होत्या. त्यालाच प्रत्युत्तर देण्यासाठी या मिशनचं नाव 'मिशन सिंदूर' ठेवलं गेलं. भारतीय सैन्य दलाने या मिशन अंतर्गत दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त केले आहेत. या माध्यमातून भारताने दहशतवाद्यांना धडा शिकवला आहे. दहशतवाद्यांनी यापुढे कोणत्याही महिलेचं सिंदूर पुसण्याची हिंमत केली तर ते युद्धासारखं मानलं जाईल हा स्पष्ट संदेश या प्रत्युत्तरातून दिला आहे. भारताने आंतरराष्ट्रीय कायद्याच्या कक्षेत कारवाई केली. या कारवाईचा कोणत्याही नागरी स्थानावर किंवा सामन्य नागरिकांवर परिणाम झाला नाही. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने हे स्पष्ट केलं की, ही कारवाई फक्त दहशतवादाविरुद्ध होती. पाकिस्तानच्या सार्वभौमत्वावर हल्ला नाही. पण पाकिस्तानमध्ये या हल्ल्यानंतर खळबळ उडाली आहे. अनेक दहशतवादी अड्डे रिकामी करण्यात आले आहेत.

# स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर करा

## चार आठवड्यांच्या आत निवडणुका जाहीर करा: न्यायालय

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**गेल्या अडीच-तीन वर्षापासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत चार आठवड्यात निर्णय घ्या, असे स्पष्ट आदेश सर्वोच्च न्यायालयाने आज महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाला दिले. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि एन. के. सिंग यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. लाईव्ह लॉने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.**



आयोगाच्या २०२२ च्या अहवालापूर्वी महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार ओबीसी समाजाला आरक्षण देऊन या निवडणुका घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. "जे. के. बांठिया आयोगाच्या २०२२ च्या अहवालापूर्वी महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार ओबीसी समुदायांना आरक्षण दिले जाईल," असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि एनके सिंह यांच्या खंडपीठाने राज्य निवडणूक आयोगाला चार आठवड्यांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अधिसूचित करण्याचे निर्देश दिले. चार महिन्यांच्या आत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश खंडपीठाने दिले. गरज पडल्यास निवडणूक आयोगाला मुदतवाढ मागण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालामुळे मुंबईसह राज्यसभरातील महापालिकांच्या निवडणुका लवकरच लागण्याची शक्यता आहे. गेल्या अडीच ते तीन वर्षांपासून या निवडणुका रखडल्या आहेत. महापालिकांसह अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांची सदस्य संख्या किती असावी, प्रभाग रचना कशी असावी आणि प्रभाग रचना, सदस्यांची संख्या राज्य निवडणूक आयोगाने ठरवावी की राज्य सरकारने आणि ओबीसी आरक्षणासहित निवडणुका व्हाव्यात की नाही आदी विविध विषयांवर सर्वोच्च न्यायालयात याचिका प्रलंबित होती.

### न्यायालयाने काय म्हटलंय?

सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने असं निरिक्षण नोंदवलंय की स्थानिक संस्था अनिश्चित काळासाठी अडखळत ठेवता येणार नाहीत आणि वेळेवर निवडणुका हे तळागाळातील लोकशाहीचे सार आहे. त्यामुळे जिथं मुदत संपली आहे किंवा प्रशासन राज असलेल्या महानगरपालिका, परिषदा, नगर पंचायती आणि जिल्हा परिषदांसाठी निवडणुका घेण्यात याव्यात, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले. सुनावणीदरम्यान खंडपीठाने महाराष्ट्र राज्याचे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांना विचारले की निवडणुका का घेतल्या जाऊ शकत नाहीत. संपूर्ण लोकशाही प्रक्रिया ठप्प झाली आहे. अधिकाऱ्यांची कोणतीही जबाबदारी नाही. सध्याच्या आकडेवारीनुसार निवडणुका घेण्यास परवानगी का देऊ नये?" असं न्यायमूर्ती कांत यांनी विचारलं.

# मिका सिंग अमिताभ बच्चन यांच्याबाबत काय म्हणाला?

गायक मिका सिंग हा त्याच्या गाण्यासाठी जितका प्रसिद्ध आहे. तितकाच तो त्याच्या वक्तव्यांमुळेदेखील चर्चेत असतो. अनेकदा तो मुलाखतींमध्ये बॉलीवूडमधील कलाकारांचे किस्से सांगतो, त्यामुळे त्याची चर्चा होताना दिसते.आता मिका सिंगने एका मुलाखतीत अमिताभ बच्चन यांचा किस्सा सांगितला आहे. मिका सिंगने शुभांकर मिश्राला मुलाखत दिली. या मुलाखतीत मिका सिंग म्हणाला, “एका दिवाळी पार्टीला मी अमिताभ बच्चन यांच्या घरी गेलो. मला आमंत्रण दिले नव्हते. तरीसुद्धा मी माझी हमर ही गाडी घेऊन गेलो. माझी मोठी गाडी बघून गेटवरील पहारेकऱ्यांनी माझ्यासाठी गेट उघडले. त्यांना वाटले असणार की मलाही आमंत्रण आहे. कारण- त्यांना वाटले की मी कोणीतरी प्रसिद्ध व्यक्ती आहे. मी दोन-तीन वेळा गाडी तिथून फिरवली. तेव्हा अमिताभ बच्चन मला म्हणाले की असे करण्यापेक्षा तू पार्टीत सहभागी हो. त्यानंतर मला ओशाळल्यासारखे वाटले.”मिका सिंग पुढे म्हणाला, “मी घरात गेलो. तिथे सगळे नावाजलेले, प्रसिद्ध व्यक्ती हजर होत्या. सचिन तेंडुलकर, अंबानी हे अमिताभ बच्चन यांच्या भोवती उभे होते. इतर अनेकजण त्यांना भेटण्याची वाट बघत होते. त्या सगळ्यांना बघून मला अस्वस्थ वाटू लागले. मी तिथून



निघून जाण्याचा प्रयत्न करत होतो. त्याचवेळी अमिताभ बच्चन यांनी सगळ्यांसमोर माझे नाव घेतले आणि मला थांबण्यास सांगितले. त्यांना तसे करण्याची काही गरज नव्हती. पण त्यांनी ते केले. मी सगळ्यांची भेट घ्यावी, म्हणू त्यांनी मला थांबायला लावले.याआधीदेखील मिका सिंगने अनेकदा सलमान खान, शाहरुख खान व अमिताभ बच्चन त्याचे आवडते कलाकार असल्याचे म्हटले आहे. हे कलाकार ज्या माणुसकीने इतरांशी वागतात, ज्या प्रेमळपणे वागवतात, त्याचे अनेकदा मिका सिंगने कौतुक केले आहे. मिका सिंगने शाहरुख खान व अमिताभ बच्चन यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांना ५० लाख रुपयांची अंगठीदेखील भेट म्हणून दिली आहे. या दोन्ही कलाकारांनी ही अंगठी परत करण्याचा प्रयत्न केला. मात्र, मिका सिंगने ती अंगठी परत घेतली नाही. याच मुलाखतीत मिका सिंगने सलमान खानबाबत वक्तव्य केले होते.

## दीड वर्षांनंतर दाक्षिणात्य सुपरस्टार होणार बाबा

दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील सुपरस्टार्स नेहमी चर्चेत असतात. कधी त्यांच्या कामामुळे तरी कधी वैयक्तिक आयुष्यामुळे दाक्षिणात्य सुपरस्टार्स चर्चेत असतात. नुकत्याच एका दाक्षिणात्य सुपरस्टारने आनंदाची बातमी दिली आहे. या सुपरस्टारचं दीड वर्षांपूर्वी इटलीमध्ये मोठ्या थाटामाटात लग्न झालं होतं. त्यानंतर आता हा सुपरस्टार लवकरच बाबा होणार असल्याचं समोर आलं आहे. दाक्षिणात्य सुपरस्टार वरुण तेजच्या घरी पाळणा हलणार आहे. अभिनेत्याने सोशल मीडियावर एक छानसा फोटो पोस्ट करत ही आनंदाची बातमी चाहत्यांबरोबर शेअर केली आहे. त्यामुळे सध्या वरुण तेजवर शुभेच्छांचा वर्षाव होतं आहे.वरुण तेजने १ नोव्हेंबर २०२३ मध्ये अभिनेत्री लावण्या त्रिपाठीशी लग्नगाठ बांधली होती. इटलीमध्ये मोठ्या थाटामाटात वरुण व लावण्याचं लग्न झालं होतं.


## हिनाची रॉकीसाठी खास पोस्ट

टेलिव्हिजनवरील प्रसिद्ध अभिनेत्री हिना खान अनेक दिवसांपासून स्तनाच्या कर्करोगाने ग्रस्त आहे. परंतु, कर्करोगाशी झुंजत असतानाही अभिनेत्रीने तिच्या कामाकडे दुर्लक्ष केलेलं नाही. आरोग्यच्या अनेक समस्यांना सामोरं जाताना ती अभिनय क्षेत्रातही सक्रिय आहे. अशा वेळी इंडस्ट्रीतील अनेक कलाकारांनी हिनाच्या या धाडसाचं कौतुक करीत, ती लवकर या आजारातून मुक्त व्हावी, अशी सदिच्छा व्यक्त केली. तर, अनेक जण यातून ती लवकर बरी व्हावी म्हणून तिला पाठिंबा देत आहेत. या आजारपणात, हिनासाठी तिचं कुटुंब व प्रियकर रॉकी जैस्वाल ठामपणे तिच्यामागे उभे आहेत. कर्करोगामुळे होणाऱ्या वैद्यकीय उपचारादरम्यान हिनाचा बॉयफ्रेंड रॉकी कायम तिच्याबरोबर असल्याचं दिसतं. त्यामुळे हीना तिच्या आयुष्यातील या महत्त्वाच्या माणसांसाठी कायम सोशल मीडियावर काही ना काही पोस्ट करीत त्यांचे आभार मानत असते. अशातच आता अभिनेत्रीनं नुकतीच एक पोस्ट शेअर केली आहे.शेअर केलेल्या पोस्टमध्ये हिना व रॉकी यांचे काही गोड फोटो पाहायला मिळत आहेत. तर या फोटोंमागे ‘बेटर टुगेदर’ असं लिहिलेलं आहे. हिनाने या पोस्टखाली ‘हमदर्द’ अशी कॅप्शन देत रॉकीचे आभार मानले आहेत. रॉकीनंही या फोटोखाली कमेंट केली आहे. हिनानं शेअर केलेल्या या फोटोखाली तिच्या चाहत्यांनी कमेंट्स केल्याचे दिसत आहेत.



## लीना भागवत यांनी आपली खंत व्यक्त केली

महाराष्ट्रात नाटकांची एक समृद्ध परंपरा आहे. आजही नाटक पाहणारा एक मोठा प्रेक्षकवर्ग आहे; जो न चुकता नाटक पाहायला जातो. नाटक पाहण्याकरता अनेक नाट्यरसिक येत असतात; पण त्यातील काही प्रेक्षक हे कलाकारांसाठी उपद्रवी ठरतात. नाटक सुरू होण्याआधी रंगमंचावरुन अनेकदा प्रेक्षकांसाठी त्यांचे मोबाईल फोन बंद करण्यासाठी सूचना केली जाते. मात्र तरीही काही प्रेक्षकांकडून मोबाईल फोन सुरूच राहतात आणि ते चालू नाटकात वाजतात, ज्यामुळे कलाकारांना त्रास होतो. नाटकाच्या चालू प्रयोगात मोबाईल फोन वाजल्याबद्दल अनेक कलाकारांनी त्यांचा रोष, नाराजी आणि वेळप्रसंगी संतापही व्यक्त केला आहे. अशातच आता या विषयावर अभिनेत्री लीना भागवत यांनी आपली खंत व्यक्त केली आहे. लीना भागवत या मराठी कलाविश्वातील लोकप्रिय आणि दिग्गज अभिनेत्री आहेत. त्यांनी आजवर अनेक गाजलेल्या नाटक आणि मालिकांमध्ये भूमिका साकारल्या आहेत. लीना भागवत यांनी नुकतीच आरपारला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी नाटकात वाजणाऱ्या मोबाइल फोनबद्दल त्यांचं मत व्यक्त केलं.यावेळी त्यांनी असं म्हटलं की, “काही प्रेक्षक नाटक सुरू झाल्यानंतरही मोबाईल वापरतात. पण याला काही करु शकत नाही. हा हतबलतेचा त्रास आहे. म्हणजे मला भीती वाटते की, जेव्हा ब्लॅक-आऊट होतो तेव्हा एखादा लाइट दिसतो. मोबाईमध्ये कोणीतरी काहीतरी चेक करत असतं किंवा नाटक संपल्या संपल्या आम्ही (कलाकार) रंगमंचावरुन जायच्या आधी प्रेक्षक ‘एक फोटो हवा आहे’ म्हणून येतात. प्रेक्षकांविषयी मला खूप आदर आहे; पण मी हे बोलतेय.”यापुढे त्या म्हणाल्या की, “मला असं वाटतं की, माझ्या सादरीकरणात इतकी त्रुटी आहे का?



## अमेयने केली गौतमी पाटीलची पोलखोल

अमेय वाघ हा मराठी इंडस्ट्रीतील आघाडीच्या अभिनेत्यांपैकी एक आहे. तो नेहमीच हटके कथानक असलेल्या चित्रपटांतून प्रेक्षकांच्या भेटीला येत असतो. काही वर्षांपासून तो मोठ्या पडद्यावर सातत्यानं सक्रिय असल्याचं दिसतं. पण, अमेयला खऱ्या अर्थानं प्रसिद्धी मिळाली ती छोट्या पडद्यावरील ‘दिल दोस्ती दुनियादारी’ या मालिकेतून. या मालिकेत त्यानं साकारलेल्या कैवल्यच्या भूमिकेला प्रेक्षकांची चांगली पसंती मिळाली होती. पण, यानंतर अमेय मालिकांमध्ये फारसा दिसला नाही. परंतु, आता अमेय वाघ पुन्हा टेलिव्हिजनवर परतला आहे. ‘स्टार प्रवाह’ वाहिनीवरील ‘शिट्टी वाजली रे’ या कार्यक्रमाचं तो सूत्रसंचालन करताना दिसतो. प्रसिद्ध कलाकार पाहायला मिळत आहेत. कलाकारांसह इन्फ्लुएन्सरही या कार्यक्रमात सहभागी झाले आहेत. अशातच नुकतीच अमेयने ‘एबीपी माझा’ला मुलाखत दिली. या मुलाखतीमध्ये त्याने कार्यक्रमातील अभिनेता व इन्फ्लुएन्सर जोडीचा गमतीशीर किस्सा सांगितलं आहे. ‘शिट्टी वाजली रे’ या कार्यक्रमातील सदस्यांबद्दल बोलताना तो म्हणाला, “गौतमी पाटील व हेमंत ढोमे ही एक जोडी होती. गौतमीला आपण भारी डान्स करताना पाहिलं आहे आणि तिच्या कार्यक्रमांनाही लोक मोठ्या संख्येने गर्दी करतात. तर, हेमंत हा एक चांगला दिग्दर्शक व अभिनेता आहे. त्यामुळे या दोघांना बघितल्यानंतर साधारण आपल्याला असं वाटतं की, गौतमीला स्वयंपाक येत असावा आणि हेमंतला काही येत नसेल; पण याच्या अगदी विरुद्ध चित्र मी पाहिलं. हेमंतला सगळा स्वयंपाक येतो आणि गौतमीला काहीही येत नाही.

# मुंबईचा अखेरच्या चेंडूवर पराभव!

## हार्दिकचा डायरेक्ट हिट चुकला अन् असा जिंकला गुजरात संघ

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**गुजरात टायटन्स मुंबई इंडियन्सवर थरारक विजय मिळवत गुणतालिकेत पहिलं स्थान गाठलं आहे. पावसाच्या व्यत्ययामुळे सामना दोन वेळा थांबून उशिरा सुरू झाला. त्यामुळे १९ षटकांचा सामना खेळवण्यात आला. गुजरातला विजयासाठी ६ चेंडूत १५ धावांची गरज होती.**



चहर गोलंदाजी करत होता तर राहुल तेवतिया आणि गेराल्ड कुत्सिया फलंदाजी करत होते. चहरच्या पहिल्या चेंडूवर तेवतियाने चौकार लगावला आणि मुंबईला स्लो ओव्हर रेटचा फटका बसला. तिसऱ्या चेंडूवर कुत्सियाने षटकार लगावला. चौथ्या चेंडू नो बॉल टाकल्याने फ्री हिट होती. चौथ्या चेंडूवर तेवतियाने १ धाव घेतली. पाचव्या चेंडूवर कुत्सिया झेलबाद झाला. सहाव्या चेंडूवर १ धावेची गरज असताना अरशदने चेंडू समोरच्या दिशेने टोलवला, पण हार्दिक थेट स्टम्प्सवर चेंडू मारायला चुकला आणि गुजरातने ३ विकेट्सने विजय मिळवला.मुंबईने दिलेल्या १५६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना सुरूवात खराब झाली. साई सुदर्शन पहिल्याच षटकात झेलबाद झाला. यासह पॉवरप्लेमध्ये गुजरातने २९ धावाच केल्या.

पण नंतर बटलर आणि गिलने ७० अधिक धावांची भागीदारी केली. हार्दिक पंड्याने यादरम्यान १० चेंडूंचं षटक टाकत १८ धावा दिल्या. त्यानंतर तिलक वर्माने शुबमन गिलने झेलही सोडला. पण पुढच्याच चेंडूवर अश्वनी कुमारने बटलरला बाद करत ती भागीदारी तोडली.अश्वनी कुमार हा कार्बिन बॉशच्या जागी कनक्शन सबस्टीट्यूट म्हणून मैदानात आला. कार्बिन बॉशला अखेरच्या षटकात दोन षटकार लगावल्यावर प्रसिद्ध कृष्णाचा बाऊन्सर थेट त्याच्या हेल्मेटवर जाऊन आदळला. त्यामुळे तो दुसऱ्या डावात उतरला नाही आणि त्याच्या जागी लाईक अ लाईक रिप्लेसमेंट म्हणून अश्वनी कुमारला प्लेईंग इलेव्हनमध्ये खेळण्याची संधी मिळाली. अश्वनीने या सामन्यात महत्त्वाची विकेट घेत मुंबईला सामन्यात कायम ठेवलं. यानंतर रूदरफोर्ड आणि गिलने यानंतर संघाचा डाव सावरत डीएलएसप्रमाणे सामन्यात एक पाऊल पुढे राहिले. अखेरीस १४ षटकांनंतर पावसामुळे सामना थांबला. त्यानंतर सामना पुन्हा सुरू झाला. दरम्यान १५वे षटक टाकण्यासाठी जसप्रीत बुमराह आला आणि त्याने गिलला क्लीन बोल्ड केले. त्यानंतर पुढच्या षटकात बोल्टने रूदरफोर्डला LBW बाद केले. पुन्हा बुमराह १७वे षटक आणण्यासाठी आला आणि त्याने शाहरूख खानला क्लीन बोल्ड करत सामना फिरवला. यानंतर १८वे षटक टाकण्याची जबाबदारी अश्वनी कुमारला दिली आणि त्याने राशिद खानला चकित करत LBW बाद केलं. १८व्या षटकानंतर सामना परत सुरू झाला आणि ६ चेंडूत १५ धावा करत गुजरातने सामना जिंकला.मुंबई इंडियन्सने नाणेफेक गमावली आणि संघ प्रथम फलंदाजीला उतरला. रोहित शर्मा आणि रायन रिकल्टन लवकर बाद झाले. पण सूर्यकुमार यादव आणि विल जॅक्सने मुंबईचा डाव सावरला. विल जॅक्स आणि सूर्याने ४३ चेंडूत ७२ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. विल जॅक्स ३५ चेंडूत ५ चौकार आणि ३ षटकारांसह ५३ धावा करत बाद झाला.सूर्यकुमार यादवने २४ चेंडूत चौकारांसह ३५ धावांची खेळी केली. तर कार्बिन बॉशने २२ चेंडूत १ चौकार आणि २ षटकारांसह २७ धावा केल्या, तर दीपक चहरने ८ धावा केल्या.

### सुदर्शन पहिल्याच षटकात बाद झाला

गुजरात टायटन्सच्या सर्व गोलंदाजांनी या सामन्यात विकेट घेतली. सिराज, अरशद खान, प्रसिद्ध कृष्णा, राशिद खान, गेराल्ड कुत्सिया यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली. तर साई किशोरने २ विकेट्स घेतल्या. चहर गोलंदाजी करत होता तर राहुल तेवतिया आणि गेराल्ड कुत्सिया फलंदाजी करत होते. चहरच्या पहिल्या चेंडूवर तेवतियाने चौकार लगावला आणि मुंबईला स्लो ओव्हर रेटचा फटका बसला. तिसऱ्या चेंडूवर कुत्सियाने षटकार लगावला. चौथ्या चेंडू नो बॉल टाकल्याने फ्री हिट होती. चौथ्या चेंडूवर तेवतियाने १ धाव घेतली. पाचव्या चेंडूवर कुत्सिया झेलबाद झाला. सहाव्या चेंडूवर १ धावेची गरज असताना अरशदने चेंडू समोरच्या दिशेने टोलवला, पण हार्दिक थेट स्टम्प्सवर चेंडू मारायला चुकला आणि गुजरातने ३ विकेट्सने विजय मिळवला.मुंबईने दिलेल्या १५६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना सुरूवात खराब झाली. साई सुदर्शन पहिल्याच षटकात झेलबाद झाला.

# भारताचे क्रिकेट कुणाची जहागीर नाही

## रतीय क्रिकेट संघाचा मुख्य प्रशिक्षक माजी क्रिकेटपटूवर संतापला

| नवी दिल्ली |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**भारतीय क्रिकेट संघाचा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर गेल्या काही काळापासून टीकेचा धनी ठरत आहे. कसोटी क्रिकेटमध्ये न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियाकडून दारूण पराभव झाल्यानंतर गौतम गंभीरच्या निवडीबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले. या टीकेला गौतम गंभीरने त्याच्या रोखठोक शैलीत प्रत्युत्तर दिले आहे.**



प्रशिक्षकपदाच्या कार्यकाळाबाबत बोलत असताना गंभीर म्हणाला, “मी हे काम हाती घेतले तेव्हाच मलाही माहीत होते की, यात चढ-उतार येतील. वातानुकूलित कॉमेंट्री बॉक्समध्ये बसलेल्या खूश करणे माझे काम नाही **[illegible]** भारतीय देशाला अभिमान मिळवून देणे हे माझे काम आहे.”एबीपी इंडियाच्या २०४७ समिटमध्ये बोलत असताना गौतम गंभीरने माजी क्रिकेटपटूंवर जोरदार टीका केली. गंभीर म्हणाला की, काहीजण मागच्या २५ वर्षांपासून कॉमेंट्री बॉक्समध्ये क्रिकेट त्यांची जहागीर आहे. पण तसे बिलकूल नाहीये. भारतीय क्रिकेट हे भारताच्या लोकांचे आहे.गौतम गंभीरने भारताला २००७ साली पहिला टी-२० विश्वचषक आणि २०११ साली एकदिवसीय विश्वचषक जिंकून देण्यात महत्त्वाची कामगिरी बजावली होती. तसेच २०१३ साली चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकल्यानंतर रोख बक्षीस नाकारल्याबद्दलही त्याने भाष्य केले. गंभीर म्हणाला, मी रोख बक्षीस नाकारले म्हणून माझ्यावर प्रश्न उपस्थित केले गेले. हे अनिवासी भारतीय लोक भारतातून पैसा कमवतात आणि कर वाचविण्यासाठी स्वतःला अनिवासी भारतीय दाखवतात. गौतम गंभीर पुढे म्हणाला की, मी कोणत्याही गटाचा किंवा क्लबचा प्रशिक्षक नाही. राजकारण खेळण्यातही मला रस नाही. मी एक स्वाभिमानी संघ तयार करण्यासाठी आलो आहे, जो निर्भयपणे आपला खेळ दाखवू शकेल. समालोचकांनी हे ध्यानात घेतले पाहीजे की, क्रिकेट कुणाचीही जहागीर नाही. हे लोक परदेशी नागिरकत्व घेऊन कर वाचवत आहेत. पण मी देशातच राहून माझा कर भरतो. प्रशिक्षकपदाच्या कार्यकाळाबाबत बोलत असताना गंभीर म्हणाला, “मी हे काम हाती घेतले तेव्हाच मलाही माहीत होते की, वातानुकूलित कॉमेंट्री बॉक्समध्ये बसलेल्या खूश करणे माझे काम नाही तर देशाला अभिमान मिळवून देणे हे माझे काम आहे.

### क्रिकेट हे भारताच्या लोकांचे आहे

”एबीपी इंडियाच्या २०४७ समिटमध्ये बोलत असताना गौतम गंभीरने माजी क्रिकेटपटूंवर जोरदार टीका केली. गंभीर म्हणाला की, काहीजण मागच्या २५ वर्षांपासून कॉमेंट्री बॉक्समध्ये बसले आहेत. त्यांना वाटते भारतीय क्रिकेट त्यांची जहागीर आहे. पण तसे बिलकूल नाहीये. भारतीय क्रिकेट हे भारताच्या लोकांचे आहे.

स्मार्ट PCMC
SMART CITY
# महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। बुधवार।
। दि. 7 मे 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांचा विश्वास

# भाजपा मजबूत : पिंपरी चिंचवडमध्ये "कमळ" च फुलणार!

## आगामी महापौर भाजपाचाच असेल, असाही केला दावा

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**विद्यार्थिनींचा आणि समाजातील वंचित घटकांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी निर्भय कन्या अभियान मोठ्या प्रमाणात राबविण्यात आले पाहिजे. यामुळे महिलांचे मनोबल आणि आत्मविश्वास वाढेल. त्यातून त्यांचे व्यक्तिमत्व विकसित होऊन त्या सक्षम नागरिक म्हणून काम करतील, हाच निर्भय कन्या अभियानाचा मुख्य उद्देश आहे असे एसबीपीआयएमच्या संचालिका डॉ. किर्ती धारवाडकर यांनी सांगितले.**



पिंपरी-चिंचवड शहरात भाजपच्या माध्यमातून विकासाची गंगा आली. समाविष्ट गावांमध्ये अनेक महत्त्वाची कामे करण्यात आली. प्रशस्त रस्ते चांगल्या मूलभूत सुविधा व सार्वजनिक वाहतूक सेवेला प्राधान्य यामुळे नागरिकांनी पिंपरी-चिंचवड शहराला निवासी करण्यासाठी पसंती दिली हे वाढत्या गृहनिर्माण संस्थांमुळे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आगामी काळात नागरिक भाजपा सोबतच राहतील. महापालिकेत भाजपचाच महापौर असेल, असा विश्वास भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला. गेल्या साडेतीन वर्षांपासून रखडलेली पिंपरी-चिंचवड महापालिकेची निवडणूक अखेर सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये होण्याचे आता स्पष्ट झाले आहे. ओबीसी आरक्षणाचा मुद्दा 'जैसे थे' ठेवून येत्या चार आठवड्यात निवडणुकीची अधिसूचना जाहीर करा, असेदेखील सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केल्यामुळे निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे.

या पार्श्वभूमीवर बोलताना आमदार महेश लांडगे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड ही उद्योग नगरी आहे. अनेकांच्या हाताला काम देणारे औद्योगिक नगरी आहे. त्यामुळे या शहरात येणाऱ्या प्रत्येकाला या ठिकाणी चांगल्या सुविधा मिळतील. विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळेल. प्रशस्त रस्ते असतील आणि सक्षम सार्वजनिक वाहतूक मिळेल या दृष्टीने नियोजन करण्यात आले. 2014 नंतर या शहरांमध्ये खऱ्या अर्थाने विकासाची गंगा अवतरली आहे.

गेल्या दहा वर्षांमध्ये साडेबारा टक्के परतावा देऊन भूमिपुत्रांना न्याय दिला. पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी आंद्रा आणि भामा आसखेड धरणांमध्ये पाणी आरक्षित केले. अतिरिक्त पाणी आपल्याला उपलब्ध झाले. निगडी ते पुणे स्टेशन, स्वारगेट, शिवाजीनगर असा मेट्रोचा मार्ग प्रशस्त केला. संविधान भवन, संतपीठ, आरटीओ, न्यायालय संकुल, धर्मवीर संभाजी महाराजांचा सर्वात उंच पूर्णाकृती पुतळा, औद्योगिक प्रदर्शन केंद्र अशा अनेक योजनांच्या माध्यमातून पिंपरी-चिंचवड शहर प्रगतीपथावर आणले आहे. त्यामुळे नागरिकांचा भाजपावर मोठा विश्वास आहे. भाजपाच्या कामाची पोचपावती नागरिक देणार आहेत, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

> "सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा केला. याबद्दल सर्वोच्च न्यायालयाचे मनःपूर्वक आभार मानतो. गेल्या दहा वर्षांमध्ये शहरांमध्ये भाजपाच्या माध्यमातून अतिशय चांगल्या प्रकारचा नियोजनबद्धरित्या विकास झाला. या शहरातील नागरिकांना आणि भूमिपुत्रांना न्याय देत शहर विकासाची भूमिका ठेवली आहे ती आगामी काळातही तशीच राहील. संघटनात्मक पातळीवर पिंपरी चिंचवड आणि भोसरी अशा तीनही विधानसभा मतदारसंघांमध्ये भाजपाने प्रभावीपणे काम केले आहे. त्यामुळे महापालिकेत पुन्हा एकदा 'कमळ' फुलेल यात शंका नाही.
>
> -महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

### टीपी स्कीम रद्द करण्यासाठी पाठपुरावा!

नगर नियोजन योजनेवरून (टीपी) सध्या संभ्रम निर्माण झाला आहे. भूमिपुत्र आंदोलनाच्या भूमिकेत आहे. प्रशासकीय राजवटीत असा एकतर्फी निर्णय घेणे योग्य नाही. याबाबत राज्य शासनाकडे पत्रव्यवहार केला आहे. चिखली, कुदळवाडी, चऱ्होली संदर्भात कोणत्याही प्रकारचा टीपी लादला जाऊ नये. हा रद्द व्हावा अशी मागणी यापूर्वीच केलेली आहे. 2019 मध्ये महापालिका सभेच्या मान्यतेनुसार "टीपी "ची अंमलबजावणी सुरू झाली होती. दरम्यानच्या काळात याबाबत कोणत्याही प्रकारची माहिती देण्यात आलेली नाही. आगामी सहा महिन्यात महानगरपालिकेच्या निवडणुका होतील आणि भारतीय जनता पार्टीच्या सत्ता काळामध्ये या पुढील काळात अशा प्रकारे मनमानीपणे निर्णय लादता येणार नाही, अशी नियमावली करणार आहोत, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

# 'पीसीसीओईआर'च्या नावे एका दिवसात ७८ कॉपी राईटची नोंद

## जागतिक महिला दिनानिमित्त शहराध्यक्ष प्रा. कविता आल्हाट यांचा पुढाकार

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँण्ड रिसर्चने (पीसीसीओईआर) शैक्षणिक क्षेत्रात नवनवीन उपक्रम राबविले असून उत्कृष्ट शैक्षणिक संस्था म्हणून नावलौकिक प्राप्त केला आहे. पीसीसीओईआरने एकाच दिवसात ७८ कॉपी राईटची नोंद करून आणखी एका विक्रमाची नोंद आपल्या नावावर केली आहे. पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या आयटी विभागाने बौद्धिक संपदा हक्कांमध्ये (आयपीआर) एक उल्लेखनीय टप्पा गाठला. आयटी विभागाच्या प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी ही कामगिरी केली.

बौद्धिक संपदा हक्क (आयपीआर) निर्मितीचे संरक्षण कसे करतात आणि योग्य मान्यता कशी सुनिश्चित करतात. आयपीआर व्यक्ती आणि संस्थांना त्यांच्या अद्वितीय कल्पना, शोध आणि कार्यांचे संरक्षण कसे करण्यास सक्षम करते याबद्दल सखोल माहिती दिली. तसेच वेगाने प्रगती करणाऱ्या तंत्रज्ञानाच्या जगात बौद्धिक संपदेचे महत्व प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांनी सांगितले.

आयटी विभागाचे प्रमुख डॉ. संतोषकुमार चोबे यांनी प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना कॉपीराइट दाखल करण्यासाठी प्रोत्साहित करून एकाच दिवसात ७८ कॉपीराइट दाखल करून उत्पादनांना सुरक्षित करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले. या उपक्रमाचे समन्वय प्रा. दिव्या पुनवंतवार यांनी केले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.


ADMISSION OPEN
Moraya Shikshan Sanstha
"यत् भावो – तत् भवति"
Computer 15 days Crash Course
Our Courses
> PowerPoint with animation
> Basic Excel
> Corel Draw
> Adobe Photoshop
> Scratch Animation
> 'C' Language
> Basic Java
> Basic Tally
From
5th May 2025
1 Hour / day
Monday to Saturday
Contact
8087706100
Registration started
Venue: Computer Lab,
V. K. Mate Highschool


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE
ADMISSIONS OPEN
2025-26
PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY
For more info
95277 64646 / 77967 67292

## उद्योजक विनायक भोंगाळे यांचा प्रेरणादायी उपक्रम


# तरुणांना घडविण्यासाठी धडपडणारा उद्योजक!

## कमवा आणि शिका योजनेतून तरुणांना रोजगार देण्याचा प्रयत्न

**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**संघर्षातून यशाला गवसणी घालायची, मात्र पाय तसेच आपल्या मातीशी घट्ट रोवून ठेवायचे. हे गमक फार थोड्या यशस्वी व्यक्तिमत्त्वांना जमते. त्यातीलच एक म्हणजे उद्योजक विनायक भोंगाळे. शाळा, महाविद्यालय, बांधकाम क्षेत्र अशा अनेक बाबतीत यशस्वी असलेल्या भोंगाळे यांनी आपल्या गावातल्या स्थानिक तरुणांना रोजगार देण्यासाठी कमवा आणि शिका या योजनेअंतर्गत मदतीचा हात दिला आहे. तरुण स्वावलंबी होण्याबरोबरच केवळ नोकरीच्या मागे न राहता उद्योजक ही होतील असा विनायक भोंगाळे यांचा दावा आहे.**

आज एक प्रतीथयश उद्योजक असलेले विनायक भोंगाळे ५० वर्षांपूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय , जळगांव (जामोद) या शाळेतून शिक्षण घेऊन बाहेर पडले. त्यांनी १९८९ मध्ये गणेशराव पाटील यांच्याकडे वार्षिक ७०० रुपये या मजुरीमध्ये सालगडी म्हणून शेतात काम केले. आज बांधकाम व्यवसायात यशस्वी उद्योजक म्हणून ओळखले जातात. शिक्षणाच्या पारंपरिक चौकटी पलीकडे जाऊन, त्यांनी फक्त पुस्तकांतून नव्हे तर प्रत्यक्ष कामाच्या अनुभवातून, 'कसे यशस्वी व्हायचे' याचे



उदाहरण घालून दिले आहे. हे सर्व यश संपादन करत असताना त्यांनी आपल्या मूळ गावाशी असलेली नाळ, आपल्या माती विषयीची जाणीव लक्षात घेऊन स्थानिक तरुणांसाठी एका नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम "कमवा व शिका" उपक्रमाची सुरुवात केली आहे. याचा उद्देश हा फक्त नोकरी नव्हे, तर उद्योजकतेचा मार्ग आहे असे विनायक भोंगाळे सांगतात. या उपक्रमाअंतर्गत, एक विशेष कॅम्पस इंटरव्ह्यू घेतला जाणार आहे. ज्यामध्ये स्थानिक तरुणांना "कमवा व शिका" या संकल्पनेअंतर्गत प्रत्यक्ष काम करत शिकण्याची संधी मिळणार आहे. व्यवसाय समजून घेण्यासाठी आणि उद्योजकतेचा पाया रचण्यासाठी एक ही एक कार्यशाळा ठरणार आहे.

**रेजिस्ट्रेशन साठी खालील QR कोड स्कॅन करा .**

तरुणांना कॅम्पस इंटरव्ह्यूसाठी 9 व 10 मे 2025 रोजी सातपुडा एज्युकेशन सोसायटी जळगाव जामोद आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज संग्रामपूर या ठिकाणी यायचे आहे. दहावी किंवा बारावी तसेच ग्रॅज्युएशन पूर्ण करणारे आणि फ्रेशर्स सुद्धा या कॅम्पस इंटरव्यू साठी पात्र ठरू शकतात.. तरुणांना.योगेश एंटरप्रायझेसद्वारे निवास आणि राहण्याची व्यवस्था केली जाणार आहे. या माध्यमातून तरुणांना आकर्षक वेतन देखील दिले जाणार आहे.

